
# माणूस

२७ सप्टेंबर १९६९ । चाळीस पैसे



स्वातंत्र्यातही शिस्त हवी
असे मानणारे चित्रकार

—आचरेकर

# माणूस

समग्र साप्ताहिक

वर्ष नववे : अंक सतरावा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी ५७३५९

किंमत ४० पैसे : वार्षिक वर्गणी वीस रुपये : परदेशची वर्गणी चाळीस रुपये


**काय मिष्टर ?**

हातोहात फसवताय काय ?

या आठवड्याचे भविष्य कुठे आहे ? एक पाच पैसे परत तरी द्या किंवा पुढच्या अंकात दोन्ही आठवड्यांची भविष्ये छापा.

—प्र. चं. राजे, मालवण.

[काय राव, भविष्याच्या एवढे आहारी जाता ! अशाने आडनावात शिल्लक आहे तेवढेही 'राजेपण' उरणार नाही आणि खरोखरच पाच पाच पैसे मागत हिंडत रहावे लागेल !

दिवाळीपर्यंत तरी तुमचे ग्रहमान अनुकूल दिसत नाही. दिवाळी अंकानंतर वक्री असलेले ग्रह सरळ झाले तर भविष्याची पाने पुन्हा सुरू करण्याचा विचार करू.

—संपादक ]

स.नं.

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# पाटकर सभागृहातील कैफियत

तीन दिवसांसाठी म्हणून भरलेले मुंबईच्या पाटकर सभागृहातील कॉंग्रेसचे शिबीर मा. यशवंतराव चव्हाण यांच्या सुरुवातीच्या भाषणाने गारीगार झाल्याने जवळ जवळ पहिल्याच दिवशी संपले.

मागील क्षेपेप्रमाणे पहिले दोन दिवस 'रमी, रम, रमणी' सारखे काही स्फोट उडतील व शेवटी यशवंतरावांच्या समारोपाने सारे शांत शांत होईल अशी बहुतेकांची या शिबिराविषयीची अटकळ, अगोदरच यशवंतरावांची कैफियत ठेवून नियोजकांनी खोटी ठरवली. या योजनाचातुर्याबद्दल नियोजक धन्यवादास पात्र आहेत. नाटकाचा तिसरा अंक प्रथमच ठेवल्यामुळे विरोधकांचा, सर्वसामान्य प्रेक्षकांचा अपेक्षाभंग होणे साहजिकच होते.

बाकी कैफियत तशी काही अनपेक्षित नव्हती. आपले चुकलेले पाऊल यशवंतरावांनी पुन्हा डाव्याउजव्याच्या ठेक्यात बरोबर जमवून घेतले हा या कैफियतीचा मतितार्थ.

'ताजमहाल'मध्ये स. का. पाटील यांच्या वाढदिवसाला खास दिल्लीहून येऊन हजर राहिल्यापासून ही पावले वेगळी पडायला लागलेली होती.

या वेगळेपणाचे कारण स्पष्ट होते.

इंदिरा गांधी अपेक्षेपेक्षा जास्त स्थिरावू लागल्या. त्या स्थिरपद होणार म्हणजे यशवंतरावांची पुढची वाट बंद. मग सिंडीकेटच्या साहाय्याने ही वाट मोकळी करून घेण्याचा नागमोडी प्रयत्न सुरू झाला. सिंडीकेटला नाही लोकमान्य प्रतिमा. सगळेच बुढढे आणि बदनाम. यशवंतराव ही उणीव भरून काढू शकत होते. म्हणून डावे पाऊल जरा मागेच ठेवून उजवे अधिक जोराने पडू लागले.

बेत धाडसाचा होता पण प्रतिपक्षाविषयीचा अंदाज चुकला. बाईंनी डाव्या बाजूने सपाटयाने घाव घालून या व्यूहाची दाणादाण उडवून दिली. यशवंतराव निसटू शकले. जीवावर बेतलेले बोटावर निभावले. आता टिकून रहायचे तर डावे निशाण उचलण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. हा समारंभ पाटकर सभागृहात उरकण्यात आला. आता पुणे-कऱ्हाडकडे एखादा फेरफटका मारून कुठेकुठे उगवलेले विरोधाचे तण उपटून काढले की दिल्ली ते गल्ली बंदोबस्त पक्का. आहे तितुके जतन करावे, नवीन संधीची वाट पहावी एवढाच काही काळ तरी कार्यक्रम.


नवीन संधीची शक्यता अशी. बाई जर फारच झुकल्या, डाव्याचे व पर्यायाने

रशियाचे वर्चस्व वाढत गेले तर लोकमत पुन्हा पलटी घेईल. अशावेळी सर्व राष्ट्र-वादी, मध्यममार्गी शक्ती यशवंतरावांभोवती गोळा होऊ शकतात. या शक्तींना आज तरी दुसरा पर्याय उपलब्ध नाही. लांब कशाला? परवाच्या धामधुमीत यशवंतराव राजीनामा खिशात घालून निघण्याच्या तयारीतही होते; पण कम्यु-निस्टांना देश पोखरण्यास रान मोकळे पडू नये, बाईंवर थोडातरी वचक राहावा यासाठी त्यांनी गृहमंत्रीपदाच्या मोक्याच्या जागी राहणे अवश्य आहे–हा सल्ला त्यांना निकटवर्तीयांकडून दिला गेला, तो त्यांनाही पटला, म्हणून राजिनाम्याचा विचार त्यांनी रहीत केला, अशीही एक मीमांसा ते महाराष्ट्रात येण्यापूर्वी प्रसृत करण्यात आलेली अनेकांच्या वाचनात असेल. यात अगदीच तथ्य नसेल असे नाही.

राजकारण हे सेवेचे साधन मानणाऱ्या परंपरेपासून यशवंतराव तसे दूर आहेत. कधीकधी आठवून ते या परंपरेचा गौरव करतात यात औचित्याचा भागच अधिक असतो. सहसा ते आपणहून अशा वरच्या पट्टीत जात नाहीत. हा त्यांचा राजकीय भूमिकेबाबतचा प्रामाणिकपणा, स्पष्टपणा त्यांच्या वैशिष्टयपूर्णतेची एक साक्ष आहे. हे त्यांचे वैशिष्टय पाटकर सभागृहात प्रकट झाले नाही. 'सत्तेचा मला मोह नाही,' 'काँग्रेसच्या ऐक्यासाठी मी एकटा शेवटपर्यंत लढन' 'समाजवादाचे निशाण इंदिराजींनी खांद्यावर घेतल्यामुळे मी त्यांचे नेतृत्व निःसंदिग्धपणे स्वीकारीत आहे.–' या भाषेमुळे त्यांच्या कैफियतीला उगाचच कृत्रिम गडदपणा आला. ती अगदीच 'वाहतो ही दुर्वांची जुडी' झाली.

सत्तेसाठी विशिष्ट मर्यादेत राजकारण करण्यात गैर काहीच नाही पण असे राजकारण करणाऱ्या मराठी नेतृत्वाला एखादी शापबाधा असावी का? भारतात आदराने, श्रद्धेने मानली गेलेली मराठी परंपरा त्यागाधिष्ठित, तत्वनिष्ठ, लढाऊ राजकारणाची आहे. शिवाजी-टिळक ही ती परंपरा. भारतीयांच्या हृदयसिंहासनावर ही आरूढ झालेली आहे किंवा होण्याच्या मार्गावर आहे. दिल्लीच्या सिंहासनावर दृष्टि असलेली दुसरी राजकीय मराठी परंपरा मात्र शेवटच्या पायरीपर्यंत चढत चढत जाते, पण शेवटी कुठेतरी योग्यता असूनही अडखळते. सदाशिवराव भाऊंनी विश्वासराव पेशव्यांना दिल्लीच्या सिंहासनावर बसवून मोगल बादशाही निकालात काढण्याचा घाट घातला. त्यावेळी सुरजमल जाठ आडवा आला आणि भाऊंना केवळ तख्त फोडण्यावरच समाधान मानावे लागले. महादजी शिंदे तर दिल्ली-पतींना बोटांवर खेळवीत होते; पण दिल्लीपती म्हणून पाटीलबावांची द्वाही कधी उत्तरेत फिरली नाही. अंगी कर्तृत्व असूनही सर्वोच्च स्थानापासुन मराठी नेतृत्वाला निदान आजवर तरी असे वंचित ठेवण्यामागे नियतीचा काय हेतु असावा, न कळे!

– श्री. ग. मा.



# दिल्ली

## दिनांक १६ सप्टेंबर

### वाक्‌युद्धाची दुसरी फेरी

सिंडिकेट विरुद्ध इंडिकेट फ्रीस्टाईल दंगल कधी चीत कधी पट अशा थाटात अजून चालूच आहे. आरोप आणि प्रत्यारोप यांच्या फेरीत अखेर कोण गारद होणार हे सध्या सांगणे कठीण. सिंडिकेटच्या वतीने अप्पाजींच्या मदतीला आता महारथी मोरारजी धावून आले आहेत आणि त्यांनी अशी अजब सूचना केली आहे की इंदिराजींना आपल्या ' चुका ' कबूल करायला लावण्यासाठी काँग्रेसजनांनी सत्याग्रह करावा. काही काँग्रेसी मंडळींनी इतर काही काँग्रेसी मंडळींविरुद्ध करायच्या या अभूतपूर्व सत्याग्रहाचे नक्की स्वरूप काय ? मोरारजींचे उत्तर : सध्या तरी माझ्यापुढे काही निश्चित स्वरूप नाही. नसेना का. मोरारजींनी एका अफलातून कल्पनेचे पिल्ल सोडून दिले आहे, तेव्हा आता दोन्ही काँग्रेसमधल्या बऱ्याच मंडळींच्या कल्पना-शक्तीला रिकामपणचे खाद्य मिळणार यात शंका नाही.

इतर सिंडिकेटी मंडळीही आता ताजीतवानी होऊन पुनश्च रणांगणात दाखल झाली आहेत. ' परक्कलम् ' या एका शब्दापलीकडे फारसे कधी न बोलणाऱ्य कामराजांनीही दिनांक २५ जुलैच्या एकी ठरावानंतर चार वेळा बेकीचा उल्लेख केला आहे. सदोबा तर काय, सिंहच ! त्यांनी आपल्या गर्जना चालूच ठेवल्या आहेत. शिवाय अतुल्य घोष आणि चंद्रभानु गुप्ता ही द्वयी आहेच. बाईंनी नुकताच उत्तर प्रदेश व बंगालचा दौरा केला तेव्हा प्रकरण आपल्या मते मिटलेले नाही अशी दोघांनीही बाईंना समज दिल्याचे म्हणतात.

एकीकडे हे शीतयुद्ध चालू असताना दुसरीकडे दोन्ही गट आपापल्या सामर्थ्याची चाचणी करण्यात गुंतले आहेत. ही चाचणी अजून संपलेली नसल्यामुळेच कसोटीच्या सामन्याची दुसरी फेरी — म्हणजेच ए. आय्. सी. सी.चे अधिवेशन — इतक्यात होईल की नाही हे सांगता येत नाही. जोपर्यंत आपल्या ताकदीचा नीट अंदाज आलेला नाही तोपर्यंत आपण होऊन सेशनचा समरप्रसंग ओढवून घ्यायचा नाही असा दोन्ही गटांचा पवित्रा दिसतो. (—अर्थात् मध्यममार्गी यशवंतराव आणि कंपनी आजचे मरण उद्यावर टाळायला एका पायावर तयार आहे हे सुज्ञास सांगणे नलगे.) सध्या

सर्व सिंडिकेटी–इंडिकेटी नेते–मंडळींनी जोरात चालविलेल्या भारत–दर्शन यात्रा म्हणजेच याच शक्ति–संचयासाठी चाललेली धावपळ आहे.

इंदिराजींचे सध्या चाललेले दौरे आपल्या भूमिकेला पाठिंबा मिळविण्यासाठी चालले आहेत हे उघड गुपित आहे. बाईंचे उजवे–डावे हात जगजीवनराम व फकरुद्दिन मिया आपापल्या स्वप्रांती म्हणजे अनुक्रमे बिहार व आसामला नुकतीच भेट देऊन आले ते बाईंचे हित साधण्यासाठीच. उलट सिंडिकेटही सैरावैरा धावत सुटली आहे. इंदिराजींच्या पावलावर पाऊल ठेवून निजलिंगप्पा एकदा उत्तर प्रदेशात जाऊन आले व आता पुन: गेले आहेत. शिवाय इतर प्रांतांतही त्यांचा संचार होणार आहे असे म्हणतात. मोरारजींनी नुकतीच गुजराथ, महाराष्ट्र, तामिळनाडू अशी त्रिस्थळी यात्रा केलीच आहे व तेही इतरत्र जाण्याची शक्यता आहे. दरम्यान दोघे राजधानीत येऊन काही खलबत करून गेले. या भेटीत सिंडिकेटचा पुढचा पवित्रा काय असावा याची चर्चा झाल्याचे कळते. इतर सिंडिकेटी नेतेही म्हणे निरनिराळ्या प्रांतांत भ्रमंती करणार आहेत. हा सर्व खटाटोप अर्थात् एवढ्यासाठीच चालला आहे की प्रांतीय मंडळी–विशेषत: प्रांतांतले ए. आय्. सी. सी. सदस्य–किती आपल्या बाजूला आहेत व किती प्रतिस्पर्धी गोटात याचा अंदाज येऊन पुढची व्यूहरचना करता यावी.

पुनश्च युद्धाला तोंड केव्हा फोडायचे, कोठे फोडायचे, व ते फोडण्याच्या कामी पुढाकार कोणी घ्यायचा हे या मूल्यमापनावर अवलंबून राहणार आहे. काँग्रेस कार्यकारिणीच्या एकी–प्रस्तावाने रामाय स्वस्ति, रावणाय स्वस्ति अशा थाटात पक्ष–प्रमुख व सरकार–प्रमुख या दोघांचेही आपापल्या क्षेत्रातले महत्त्व मान्य केले असल्याने आता पुढची साठमारी तिच्या रिंगणात होईल असे वाटत नाही. उलट आता प्रश्न असा आहे की खडाष्टक उडवायचे ते ए. आय्. सी. सी. च्या अधिवेशनात की त्याहून मोठ्या अशा अखिल पक्षीय प्रतिनिधि–अधिवेशनात? ए. आय्. सी. सी. चे अधिवेशन अहमदाबादेला भरविण्यास इंडिकेटने आपला विरोध प्रकट केला आहेच, व सिंडिकेटही हा मुद्दा ताणून धरील असे वाटत नाही, तेव्हा हा शत्रु-मित्र-मेळावा राजधानीत भरण्याची शक्यता बरीच आहे.

## एका डोक्यावर दोन मुकुट ?

दरम्यान आपल्या रघुनाथराव खाडिलकरांना अचानक इंदिरा हीच प्रियदर्शिनी होय असा साक्षात्कार झाला आहे. बाईंना ते आग्रह करीत आहेत–" तुम्ही प्रधानमंत्राणी आहातच, त्याच्या जोडीला काँग्रेस–अध्यक्षादेखील व्हा." बाई विनयाने म्हणाल्या, " छे बाई! एवढे ओझे मला पेलणार नाही." सदोबांनी खाडिलकरांची प्रस्तुत सूचना 'मूर्खपणा'ची असल्याचे म्हटले, तर खाडिलकर म्हणाले " तुम्हीच मूर्ख आहात." एकूण फिट्टंफाट! पण एकीकडे इंदिराजी नको नको म्हणत असतानाच अशाही वावड्या उडत आहेत की निजलिंगप्पांना पदच्युत करून काँग्रेस-

अध्यक्षपदाचा किल्ला कसा सर करायचा याचा इंदिराजींचे पक्षपाती विचार करीत आहेत. उलट अप्पाजींचा गादी सोडण्याचा विचार मुळीच नाही. त्यांची मुदत आणखी वर्षभर आहे.

## कॉंग्रेसमधला हिप्पी संप्रदाय !

इंदिरा – अप्पा बेबनावाचा एक 'साइड – इफेक्ट' म्हणजे काही कॉंग्रेसी बॅक-बेंचर्सना 'हम भी कुछ है।' अशी नेतेगिरीची अचानक जाणीव झाली आहे. त्यातले एक म्हणजे कॉंग्रेस सोशालिस्ट फोरम नामक कॉंग्रेस–कंपनीचे निमंत्रक शामनंदन मिश्र. खाडिलकर जितक्या हिरीरीने इंदिरा–अनुनय करीत आहेत तितक्याच अभिनिवेशाने मिश्राजी सिंडिकेट – समर्थन करीत आहेत. परवापासून महाराष्ट्र–कॉंग्रेस आणि मुंबई कॉंग्रेसचे एक संयुक्त कार्यकर्ता – शिबीर भरणार आहे त्यात भाग घेणाऱ्या एक हजार मंडळीना मिश्राजींनी एक पत्र पाठवले आहे, ते मोठे रोचक आहे. सारांश असा :

नेहरूजींच्या मृत्यूनंतर कॉंग्रेसमध्ये जे सामुदायिक नेतृत्व निर्माण झाले होते त्याची आता अधिकच आवश्यकता आहे. कॉंग्रसमध्ये सध्या उद्भवलेला हिप्पी संप्रदाय कॉंग्रेसचाच नव्हे तर लोकशाही व समाजवादाचाही घात करील. पक्षाला आता नैतिक पायाच उरला नसल्याने पक्षाचे व्यक्तिमत्व असे राहिलेलेच नाही. राष्ट्रपती-निवडणुकीच्या वेळी संधीसाधुपणाचा इतका कळस झाला की काही कॉंग्रेसी सूर्याजी पिसाळांनी कॉंग्रेसच्या कट्टया शत्रूंशी हातमिळवणी केली. पक्षाच्या कार्यकारिणीला व संसदीय समितीला सरकार-प्रमुखाची बटीक व्हावे


### श्रीगणेश नित्य उपासना

'श्रीगणेश प्रताप' व 'श्रीगणेश आराधना' यांच्या प्रकाशनानंतर श्री-मयूरेश प्रकाशनचे श्री. माधव त्रिंबक परचुरे यांनी 'श्रीगणेश नित्य उपासना' हे श्रीगणेशाच्या उपासकांसाठी मार्गदर्शनपर असे नवे पुस्तक प्रकाशित केले आहे.

या पुस्तकात पहाटेपासून रात्रीपर्यंतची श्रीगणशाची उपासना–मंगलाचरण, प्रातःस्मरण, भूपाळ्या, कांकडआरती, नित्यपूजा, सार्थ अथर्वशीर्ष, शंकराचार्यादि थोर आचार्यांनी रचलेली श्रीगणेशाची विविध स्तोत्रे, सायंप्रार्थना, धूपारती, शेजारती–थोडक्यात म्हणजे श्रीगणेशाची पद्धतशीर उपासना संग्रहीत करण्यात आली आहे.

दुरंगी छपाई केलेल्या, पॉकेटसाइजच्या १०० पानांच्या या पुस्तकाची किंमत एक रुपया आहे.

प्रकाशक : माधव त्रिंबक परचुरे

द्वारा–बलवंत पुस्तक भांडार, गिरगाव नाका, मुंबई ४

जागते की काय अशी भीती निर्माण झाली आहे. मतस्वातंत्र्याचा बाटलीतला राक्षस आता मोकाट सुटला आहे. तो पुन: सहजासहजी बाटलीत बंदिस्त करता येणार नाही. सध्याच्या भांडणात तत्त्वज्ञानाचा 'स्मोकस्क्रीन' उभा करण्यात आला आहे; पण तत्त्वज्ञानाची खरोखरीच कुणाला चाड असती तर सांप्रतच्या अग्निदिव्यातून नवीन कॉंग्रेस जन्माला आली असती. उलट आता ज्या दोन जमाती जन्मल्या आहेत त्यांचा वर्णसंकर होणे शक्य दिसत नाही. इत्यादि इत्यादि वगैरे वगैरे.

## संयुक्त समाजवाद्यांचा विभक्त गोंधळ

कॉंग्रेसमध्ये हा सवता सुभा आहे तर संयुक्त समाजवाद्यांचा सावळा गोंधळ मागील अंकावरून पुढे चालूच आहे. एकीकडे राजनारायण इंदिराजींना खाऊ की गिळू करीत आहेत तर दुसरीकडे एसेमनी बॅंक-राष्ट्रीयीकरणाच्या 'प्रागतिक' कार्यवाहीला पाठिंबा देण्याची तयारी दर्शविली. इतकेच नव्हे तर बाईंची पाठ थोपटण्यासाठी भरवलेल्या काही जाहीर सभानाही एसेम हजर राहिले; त्यामुळे पक्षात जे काही मूठभर अनुयायी आहेत त्या बिचाऱ्यांचा अधिकच बुद्धिभेद झाला आहे. एसेमच्या उलट जॉर्ज फर्नांडिस म्हणताहेत, "बॅंक-राष्ट्रीयीकरणाची मागणी केल्याबद्दल आमचे शेकडो कार्यकर्ते तुरुंगातदेखील गेले आहेत; पण तीच मागणी आता फलद्रूप झाल्यावर इंदिराभिनंदनाचे सोहळे होतात याचा अर्थच मला कळत नाही. केवळ राजकीय डाव म्हणून ही गोष्ट करणाऱ्या इंदिराजींचा नसता उदोउदो करण्यात येत आहे..."

इतर विरोधी मंडळीत भारतीय क्रांतिदलाच्या राष्ट्रीय कार्यवाहक समितीची बैठक दिल्लीत आजच सुरू झाली आहे, तर भारतीय जनसंघाच्या कार्यकारिणीची बैठक उद्या सुरू होत आहे. भाक्रांदच्या जवळ जवळ अर्ध्या मंडळींनी ऐन वेळी पगडी फिरविल्यामुळे रेड्डी पडले हे आता भाक्रांदलाही अप्रत्यक्षपणे मान्य झाले आहे. पण त्याबद्दल स्वतंत्रांनी आपल्याला ठपका द्यावा याचा मात्र त्यांना राग आला आहे. झाले ते का झाले याबद्दल त्यांचा खुलासाही मोठा सोज्वळ आहे; "आम्ही मतदानाच्या बाबतीत सदस्यांवर 'चाबक' उगारलाच नव्हता, प्रत्येकाने आपापल्या अक्कल-हुशारीप्रमाणे मत द्यावे असे म्हटले होते — पण अक्कल हुशारी दिसली नाही."

जनसंघाच्या कार्यकारिणीची बैठक मधोकांच्या निमित्ताने परंतु त्यांच्या मर्जी विरुद्ध व त्यांच्या गैरहजेरीत घेण्यात येत आहे. परंतु सध्या तरी हे पेल्यातले वादळ ठरणार असे दिसते. माझा पक्ष-नेत्यांशी तात्त्विक मतभेद नाही असे मधोक आवर्जून सांगत आहेत व 'अनामिका'ने परवा एका जबाबदार नेत्याला चाचपून पाहिले त्यावरून दिसते की पक्ष सोडून जाण्याचा मधोकांचा विचार नाही. एकूण कॉंग्रेस काय, विरोधी पक्ष काय, शिस्त, शिस्त, शिस्त ! त्यावर सगळी भिस्त...

— अनामिक

# एक ज्वालामुखी जन्माला येतोय

**पां. सी. वाडकर**

आजकाल आमच्यावर पुष्कळसे लिहील जातय, ऐकवलही जातय, 'तरुणांनो समजावून घ्या.' 'तरुणांच्या असंतोषाची कारणे शोधायला हवीत.' अन् आम्हाला विचारलही जातय तुम्ही अशांत आहात का ? हल्ली ही एक स्टाईलच होऊन बसलीय. आम्हाला समजावून घेवू म्हणणारे आणि आमच्या असंतोषाची कारणे शोधणारे तसा प्रयत्न करताना कुठे दिसतच नाहीत. अन् मग पुन्हा कुठेतरी दंगल, कुठेतरी मोर्चा-जाळपोळ सुरू झाली की आमचा त्याच्याशी संबंध लावला जातो.

आज तुम्ही आम्हाला विचारताय 'तरुण पिढी अशांत आहे का ?' तुमच्या या प्रश्नाला आमचे उत्तर ठरलेले आहे, होय ! आमची पिढी आज पूर्णपणे अशांत आहे अन् त्याबद्दल ती तुम्हाला दोष देत आहे. आमच्या साऱ्या अशांततेचे मूळ आहे तुमची वडिलधारी पिढी. मनुष्य प्राण्याच्या अन्न, निवारा अन् वस्त्र या तीन प्राथमिक गरजा. या तीन गरजा जेव्हा पुऱ्या होतात तेव्हा माणूस माणसाशी इमान राखतो. पण आमच्या या तीनही गरजा पुऱ्या करण्यास तुमची पिढी असमर्थ ठरलीय. तुम्ही आम्हाला जन्म दिलात; पण आमच्या पालनपोषणाचा विचार तुम्ही कधी केला नाहीत. 'तुमचे आजोबा–पणजोबा एक शेर भात जेवायचे, पंधरा पोळ्या खायचे अन् तुम्हाला साधी हड्डीदेखील फोडता येत नाही. तुम्हाला व्यायाम करायला नको. शरीर कमवायला नको.' असे वारंवार आम्हाला ऐकवले जाते; पण रेशनचे दरमहा माणशी दोन किलो तांदुळ अन् गहू (याच्यात दगडगोट्यांचे वजनच जास्त भरावे) ज्यांना तुम्ही देऊ शकत नाही त्यांना या गोष्टी सुनावण्याचा तुम्हाला काय अधिकार ? आज आमच्यापैकी कित्येक जीव अर्धपोटी अन् कधीकधी उपाशी

पोटी आला दिवस मरायला होत नाही म्हणून ढकलताहेत. ज्यावेळी तुमच्यापैकी कित्येकजण अलिशान बंगल्यात एखाद्या सुंदरीच्या बाहुपाशात गुंफलेले असतात तेव्हा सतत कोसळणाऱ्या पावसात डोळे झाकण्यापुरता आसरा शोधत कितीतरी जीव वणवण भटकत असतात अन् लज्जारक्षणार्थ बाकीचे जीव कशाकशाचा आसरा घेतात. आमचा तुम्हाला प्रश्न आहे तुम्ही आमच्या या मूलभूत गरजा कितपत पुऱ्या करू शकलात ? आमच्या मते तुमच्याकडे याचे उत्तर असलेच तर; आम्ही तुमच्यासाठी पंचवार्षिक योजना आखल्यात, अमेरिकन गहू येतोय अन् परदेशी कर्जही पुष्कळसे घेतलेय, हेच असावे. पण राव ! तुम्ही कुणी कधी आमच्या भविष्याकडे पाहिलत का ? खरे म्हणजे परदेशांकडून वारेमाप कर्ज घेताना तुम्हाला लाज वाटायला हवी पण तुम्ही आता कोडगे झालाहात अन् त्यामुळे तुम्हाला आमचा, आमच्या पुढच्या पिढीचा भविष्यकाळ दिसणे शक्य नाही; पण आम्हाला तो काळाकुट्ट दिसतोय, सर्वत्र अंधार पसरलेला आम्ही पहातोय. कर्ज ! कर्ज !! कर्ज आणि मदत !!! हे सारे आता आणखीन किती दिवस चालणार ? याला कुठेतरी बांध घातला जाणार आहे की नाही ? तुमच्यापैकी एकातही, वाटल्यास आम्ही आमच्या मातीत उपाशी मरू; पण यापुढे एकही पैशाची परदेशी मदत घेणार नाही असे सांगण्याची धमक नाही का ? कधीतरी पुढे देश परकीयांकडे गहाण टाकण्याची तुमची इच्छा आहे का ?

आता आमच्या शिक्षणासंबंधी. आमच्या लोकसंख्येच्या जवळजवळ ६६ टक्के लोक आज निरक्षर आहेत. उच्च शिक्षण तर राहोच पण कित्येकांना प्राथमिक शिक्षणदेखील नाही. तुम्ही मारे साक्षरता सप्ताह पाळता, प्रौढ शिक्षणवर्ग घेताहात पण खरोखरच ज्यांना उच्च शिक्षण घ्यायची इच्छा आहे त्यांच्यासाठी तुम्ही दिवसेदिवस फीवाढीशिवाय अन् त्यांच्या उच्च शिक्षणात अडथळे निर्माण करून ठेवण्यापलीकडे काय करताहात ? उदाहरण सांगायचे झाले तर मुंबईत सकाळची कॉलेजीस् आहेत. कित्येक शिक्षणप्रेमी विद्यार्थी स्वतःच्या कुटुंबासाठी नोकरी करून शिक्षणासाठी धडपडताहेत. यापैकी बहुसंख्य विद्यार्थी सरकारी कचेऱ्यातून कामे करतात; पण यांच्या कॉलेज-प्रवेशासाठी लागणारे साधे Employment Certificate देताना अन् परीक्षांना रजा देताना त्यांच्यावर अनेक निर्बंध लादले जाऊन त्यांना हैराण केले जाते. दिवसेदिवस परीक्षांच्या फीज् वाढताहेत मग फुकट शिक्षण तर राहोच पण स्वकष्टार्जित उच्च शिक्षण घेणेसुद्धा अशक्यप्राय होऊन बसलय. खेड्यापाड्यातून सरकारी ग्रॅन्ट घेऊन शिक्षणसंस्था जन्माला येताहेत. धूमधडाक्याने निवडून आलेल्या पुढाऱ्यांच्या हस्ते शाळांची उद्घाटने होताहेत; पण या साऱ्या शिक्षणसंस्थांची सूत्रे असतात बाजारबुणग्यांच्या हाती. हुषार पोरांच्या बुद्धिमत्तेचा बळी देऊन यांची पोरे डिग्र्या घेतात. शाळांसारख्या विद्यामंदिरातदेखील प्रवेशापासून थेट परीक्षांपर्यंत परत तीच वशिलेबाजी. शिक्षणसंस्था हा आज एक धंदा होऊ पहातोय.

अन् या शिक्षणसंस्थांतून मिळणारे ज्ञान तरी जीवनाला उपयोगी असे आहे का ? शिक्षणक्षेत्रातदेखील पुन्हा तीच गफलत. जीवनाचा अन् शिक्षणाचा काही संबंध आहे हे आपल्या गावीच नाही म्हणून आज अनेक बेकार इंजिनीअर्स खर्डेघाशी करताना दिसतात. विद्यापीठांतून जेव्हा आम्ही एखादी डिग्री वा डिप्लोमा घेऊन बाहेर पडून जीवनाच्या मार्गाला लागतो तेव्हा आपल्या या डिग्रीचा अन् जीवनाचा काडीमात्रदेखील संबंध नाही याची आम्हाला पहिली जाणीव होते. आज दरवर्षी हजारोनी तरुण-तरुणी निरनिराळ्या परीक्षा देऊन जीवनाच्या बाजारात व्यवसायार्थ उभे राहतात तेव्हा आपल्या बौद्धिक हुषारीला काहीच किंमत नाही हे त्यांना कळून चुकते. तेव्हा त्यांना योग्य प्रकारच्या नोकऱ्या देण्याची एखादी योजना सरकारजवळ आहे का ? असलीच तर Employment Exchange नामक संस्था हजारो बेकार सुशिक्षितांच्या रांगा प्रतिदिन दाराशी घेऊन उभी आहे; पण तेथेदेखील आज पैशांचा खणखणाट अधिक एकू येऊ लागलाय. तेथील नोकरवर्गाच्या नातेवाईकांनाच आज अधिक नोकऱ्या मिळताहेत. या अन् अशा प्रकारच्या संस्था बेकारी नष्ट करण्यास कितपर्यंत मदत करतात याचा अभ्यास व्हायला हवा. प्रतिदिनी बेकारांची संख्या वाढतेय अन् ह्या वाढलेल्या संख्येतूनच मग तरुणात नैराश्याची भावना जन्म घेतेय, समाजघातकी गुन्हेगार तयार होताहेत अन् आत्महत्त्या हा कायद्याने गुन्हा असूनदेखील आत्महत्त्येपर्यंत मजल जाते. तेव्हा या शिक्षणसंस्थांत, शिक्षणक्रमात अमूलाग्र बदल व्हायला हवा. नवेनवे प्रयोग व्हायला हवेत. **जीवनासाठी शिक्षणसूत्र येऊ द्या, पैशासाठी शिक्षणसूत्र बंद होऊ द्या. आमच्या आवडीनिवडीप्रमाणे शिक्षणक्रम आम्हाला निवडू द्या.**

आता थोडे जातीयता अन् धर्मासंबंधी. भारतीय संविधानाच्या कुठल्यातरी कलमाद्वारे आपले राष्ट्र निधर्मी राष्ट्र म्हणून जाहीर करण्यात आले. कायद्याने जातीयतावाद नष्ट करण्याचा प्रयत्न झालाय. पण हे सारे करताना अजूनही शहरांतील एखाद्या हॉटेलमध्ये 'येथे सर्व जाती-धर्माच्या लोकांना प्रवेश देण्यात येईल.' अशी पाटी नजरेला पडते, याचा अर्थ अप्रत्यक्षरीत्या अजूनही आम्ही येथे जातीयता मानतो असा होत नाही का ? जन्मनोंदीपासून परीक्षा फॉर्मवर जाती-धर्माचा उल्लेख करावा का लागतो ? अजूनही खेड्यातील पाणवठ्यावरून हरिजनांना हकलले जाते, नारळाच्या करवंटीतून वा त्यांच्यासाठी खास राखून ठेवलेल्या कपातून हॉटेलमध्ये त्यांना चहा दिला जातोय ही कशाची लक्षणे आहेत ? तुम्हाला जातीयतावाद नष्ट करायचा ना मग त्यासाठी सारा समाज एकवार खालपासून वरपर्यंत ढवळून निघू द्या. हे काम कायद्याने होणार नाही तर ते समाजच करू शकेल. ते कार्य आमची, आमच्या पुढची पिढी तुम्हाला करून दाखवील. आज आमची पिढी जातीयता मानीत नाही. अनेक आंतरजातीय विवाह घडून येताहेत

पण यावेळीही तुमची जुन्या धर्मरूढींना चिकटून असलेली पिढी आमच्या मार्गात आड येते. जातीयता नष्ट व्हायला हवी म्हणून सांगणाऱ्या खादीधारी पुढाऱ्यांपैकी अन् समाजसुधारकांपैकी कितीजणांनी स्वेच्छेने आपल्या मुलींची लग्ने एखाद्या योग्य हरिजन मुलाशी लावून दिलीत ? कितीशा आंतरजातीय विवाहाला तुम्ही स्वेच्छेने मान्यता दिलीय ? तुम्ही या दोहोपैकी काहीच केलेले नाही. तुम्ही फक्त भाषणे झोडताहात, गांधीशताब्दी वर्षात एखाद्या रविवारी एखाद दुसरा तास मागास वस्तीत जाऊन स्वतःच्या वैभवाचे प्रदर्शन करताहात इतकेच, पण हे सारे करण्यापूर्वी तुम्ही तुमची मने बदलायला मात्र तयार नाहीत. तिथं अजूनही कोठल्यातरी कोपऱ्यात जातीयतेचा अंगार जळतो आहे. स्वतः सरकारदेखील मागासलेल्या जमाती वगैरेंना खास सवलती ठेऊन बिगर मागास लोकांच्या मनातला जातीयतेचा अंगार पेटवायला मदत करतेय. त्यापेक्षा आपले राष्ट्र एखाद्या धर्माला वाहिले का जात नाही ? म्हणजे निदान एका धर्मासाठी, एका रक्तासाठी सारे एकत्र येतील.

आज कॉलेज मॅगेझिनच्या संपादकीय जागेपासून ते थेट मोठमोठाल्या अधिकाराच्या जागा स्वतःला तरुण समजणाऱ्या तुमच्या पिढीने अडविलेल्या; आमच्या कर्तृत्वाला कुठेच वाव नाही. आज परदेशी मानव चंद्रावर जाऊन पोहचलेला; पण यासाठी लागणारे ज्ञान आमच्याजवळ असूनदेखील आमचे एखादे यान अंतराळातदेखील पहायला मिळत नाही. आमचे हे दुःख शांततेसाठी अणूच्या गप्पा मारणाऱ्या तुम्हाला कधी कळेल का ? आमच्या ज्ञानाचा अशा कामासाठी उपयोग करण्याची योग्य संधी कधीच दिली जात नाही, कारण तुम्हाला तुमच्या खुर्च्या राखायच्या असतात. आणि मग आमच्यातलाच एखादा नारळीकर परदेशी संधी मिळताच काहीतरी विशेष करून दाखवितो तेव्हा सत्कार समारंभातून बडेजाव मारण्याची तुम्हाला एक संधी मिळते. बरे या अधिकारपदाच्या जागा अडवून तरी तुम्ही आमच्यापुढे कोणता आदर्श ठेवला आहात ? तर संधिसाधूपणा, स्वार्थीपणा. आमच्यापुढे आज आदर्श म्हणून उभ्या आहेत सिनेमातल्या नटनट्या. तुमच्या पिढीपुढे गांधी, टिळक यांसारखे आदर्श होते; पण असा एकतरी आदर्श आज तुम्ही आमच्यासाठी ठेवला आहात काय ? तुमच्यातल्या चांगल्याबद्दल आम्हाला आदर आहे, त्यापुढे नतमस्तक व्हायला आम्ही कधीही तयार असतो; पण तुमच्यातला ढोंगीपणा, समाजातल्या एका ठराविक ग्रूपने स्वतःच्या स्वार्थासाठी घातलेले नीती-अनीतीचे कुंपण आम्हाला भंपकगिरी वाटतेय, तुमचे जुन्या रूढींना चिकटून राहणे, जुनी विचारसरणी आम्हाला भंकसगिरी वाटते. सर्व क्षेत्रात आमचा कोंडमारा होतोय. कोणत्याही सनदशीरमार्गाने न सुटणाऱ्या समस्या केवळ बसेस, दूधकेंद्रे जाळल्याने सहजासहजी सुटलेल्या आम्ही पहातो अन् मग आमच्या समस्या सोडवून घेण्यासाठी आम्ही या मार्गाचा अवलंब करतो. पण त्यावेळी दोष दिला जातो तो आम्हाला; पण आम्हाला या कृतीला प्रवृत्त करणाऱ्यांना कोण जाब विचारणार ?



ओळखा बघूं कोण ?
हें अर्थात तुम्हांला ठाउक आहे.
आपल्या लाडक्या कन्येशिवाय दुसरें कोण असणार? परंतु एक चांगली गृहिणी म्हणून तिची वाढ होण्यासाठीं आपल्या ह्या बाळीला हेंच प्रेम दीर्घकाल आवश्यक आहे. तुमचीही तशीच इच्छा आहे. म्हणून तिच्या हिताकरितां तरी पुढल्या मुलाचा विचार करण्यापूर्वी कांही काल थांबा.
• डॉक्टर म्हणतात, प्रत्येक मुलांत ३ ते ४ वर्षांचे अंतर आईच्या आरोग्याच्याही दृष्टीनें जरूरीचे आहे.
• दोन मुलांत असें अंतर ठेवणें हें काम आतां सोपें झाले आहे. आतां तुम्हांला हवें तेंव्हा मूल होऊ शकेल. त्यांत दैवगतीचा भाग राहिलेला नाहीं. कुटुंब-नियोजनासाठी तुम्हीं अनेक उपाय योजूं शकतां.
याबाबत आपल्या डॉक्टरांचा अथवा कुटुंब-नियोजन केंद्राचा सल्ला घ्या.
पुढलें मूल इतक्यांत नाहीं, तीनपेक्षां जास्त तर कधींच नाहीं.
davp 69/24

स्वातंत्र्यपूर्वकाळात गुलामगिरीची समस्या सोडविण्यासाठी तुम्ही याच मार्गाचा अवलंब केला होता हे तुम्ही विसरलात; पण त्या तुमच्या कृतींना तुम्ही देशभक्तीच्या आवरणाखाली झाकून टाकलेत अन् आज आम्हाला मात्र दोष देताय. आमच्या अशा गोष्टींची प्रसिद्धी जास्त होते; पण आमच्या चांगल्याबद्दल तुम्ही कधी कौतुकाने बोलला आहात काय? देशभक्तीचे नारे लावणारे तुम्ही फक्त देशसंकटाच्या काळात देशभक्तीपर मोठाली भाषणे झोडता, नटनटयांना सोबत घेऊन फंड गोळा करता पण खरे तर अब्दुल हमीद व दिलीप गुप्ते यांच्यासारखे आम्हीच स्वत:चे बलीदान करून देशाचे रक्षण करतो. पण आमच्या या कृतीचे कितीसे कौतुक करण्यात येते? आज परदेशात हिप्पीज्‌ची पिढी जन्माला आलीय आपल्या बुद्धिसामर्थ्यावर तिकडील माणूस यांत्रिकतेने भौक्तिकदृष्टया समृद्ध होत चाललाय. तो स्वत:च एक यंत्र बनलाय. त्याच्यावर वर्चस्व गाजवतय ते यंत्र अन् हे सारे यांत्रिक जीवन पाहून माणसाला स्वत:चे दुर्बलत्व जाणवायला लागलय. आपण कुठेतरी हरवल्याची जाणीव त्याला लागून राहिलीय. यांत्रिक जीवनाचे वर्चस्व त्याला सहन होत नाही. मग या सर्वांपासून दूर पळण्याच्या प्रयत्नातून हिप्पी वगैरे संप्रदाय जन्माला आलाय. तिकडे समृद्धीतून जन्माला आलाय हिप्पीज्‌चा संप्रदाय अन् इकडे आज आमच्या देशात भौतिक समृद्धीकडे धांव घेणारा, आपली सारी स्वप्ने साकार करण्यास कुठेच वाव नसल्याने, जीवनातील सारा ढोंगीपणा अनुभवल्याने एका नैराश्याने पिडलेला, संभ्रमित अवस्थेत वाट शोधणारा, प्रस्थापित मूल्यांना उखडू पाहाणारा बंडखोर युवकांचा संप्रदाय जन्माला येवू पहातोय. तुमच्या रूढी, अंधश्रद्धा आम्ही मानीत नाही म्हणून तुम्ही आमच्यावर रागावता, आम्हाला समजून घेवू म्हणता अन् शेवटी स्वत:तच बुडून जाता. पण त्यावेळी तुम्ही विसरता की जेव्हा 'हात हे उगारण्यासाठी नसतात, ते उभारण्यासाठी असतात' अशी एखाद्या सोमनाथच्या सिंहाची आमच्या हृदयीची हाक आम्हाला ऐकू येते तेव्हा उन्हापावसाची, श्रमाची पर्वा न करता टाईट पॅन्टीतले अन् सलवार खमिजातले आम्हीच हातात फावडे-कुदळ घेवून खऱ्या अर्थाने या भूमीला सुजलाम्‌-सुफलाम् करण्याचा प्रयत्न करतो. तुम्ही साऱ्यांनी आज आपल्या खुर्च्या सोडून दूर दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक होऊन रहाण्यातच तुमचा मोठेपणा दडलेला आहे हे तुम्ही आता ओळखायला हवे. नपेक्षा आपली सारी स्वप्ने धुळीला मिळाल्याने नैराश्यात कुढत असलेल्या आमच्यातला एक प्रचंड सुप्त ज्वालामुखी कधीतरी जागा होईल अन् मग त्यात तुमचे, आमचे साऱ्यांचेच अस्तित्व नष्ट झाले तरी चालेल.

□ □ □



# शिवराम हरी राजगुरु

# काही आणखी माहिति

एक निवृत्त पत्रकार

'माणूस 'चा ६ सप्टेंबरचा अंक व त्यातील ' शहादतके बेताब आशिक–शिवराम हरी राजगुरू ' यांच्याबद्दलचा लेख वाचला व काही जुन्या आठवणींमुळे मन गहिवरले. ज्या शेकडो वीरांचे बलिदानामुळे व हजारो राजकीय कार्यकर्त्यांच्या त्यागामुळे १५ ऑगस्ट १९४७ साली आपणास अनपेक्षितपणे स्वातंत्र्य मिळाले त्या हुतात्म्यांना राष्ट्र इतक्या लौकर कसे विसरले याबद्दल खेद वाटून मन खिन्न झाले. निदान लेखणीने तरी या थोर स्वातंत्र्यवीरांस मानवंदना द्यावी म्हणून ६ सप्टेंबरचे अंकांत प्रसिद्ध झालेल्या माहितीशिवाय स्व. राजगुरूंबद्दल जी आणखी काही हकीगत प्रत्यक्ष दिसली किंवा समजली होती त्या आठवणीस उजाळा देत आहे.

सँडर्सला मारून स्व. राजगुरु पोलिस चौकीपावेतो गेले अन् रिकामे मॅगझिन (स्व. भगतसिंग यांनी टाकलेले) घेऊनच परतले व सुदैवाने सर्व सहीसलामत निसटले. या हकीगतीत स्व. राजगुरूंचे असामान्य धैर्य दिसते. तसेच अजब साहस राजगुरूंनी काशीतही केले होते.

सँडर्स हत्याकांडानंतर लाहोरहून भगतसिंग एक मिलटरी ऑफिसरचे वेषात सपत्नीक, (एका प्रख्यात क्रांतिकारकाच्या पत्नीने भगतसिंगाची पत्नी असल्याचे नाटक बरोबरच्या तान्हया लेकरासह केले होते) राजगुरु हा त्यांचा नोकर व चंद्रशेखर आझाद हे मथुरेचा एक पंडा या रूपात हे तीघेही महावीर एकाच गाडीने दिवसा ढवळ्या जागृत पोलिसांचे डोळ्यांत धूळ टाकून लाहोरहून राजरोस निसटले.

झांसी स्टेशनवर आझाद व बनारसचे आसपास राजगुरु या आगगाडीतून पोचले. नंतर लागलीच एक महिन्याचे आत राजगुरूंनी लाठीकाठीचा वर्ग काशीच्या मुख्य पोलिस स्टेशनसमोर कंपनीबागेत नागरी प्रचारिणी सभेचे शेजारी बरेच दिवस चालू ठेवला होता. या वर्गात ३०।३५ तरुण उत्साहाने नियमित भाग घेत असत. त्या

वेळचे एक तरुण पण आता वयस्क असलेले सद्गृहस्थ सध्या मुंबईत वैद्यकीचा व्यवसाय करीत आहेत.

राजगुरूंचे या धाष्टर्यास काही सीमा नव्हती. बरेच महिने राजगुरु काशीत निःशंक वावरत होते. इतकेच नव्हे तर तेथील गणेशोत्सवात त्यांचे धनुष्य – बाणाचे कौशल्यही लोकांनी पाहिले होते. पण कोणास ही कल्पना नव्हती की असा साधा दिसणारा तरुण इतका मोठा क्रांतिकारक असेल.

नंतर पुण्यात कपटाने धरले गेल्यानंतर राजगुरूंना जेव्हा लाहोरकटात गोवण्यात आले त्या वेळेस सर्व क्रांतिकारकांनी ज्या तऱ्हेने राजगुरूंना खडी ताजीम दिली तेव्हाच पोलिसांचे लक्षात आले की, क्रांतिकारकांपैकी ही फार बडी असामी आहे. आरंभी आपणास इंग्रजी किंवा हिंदी अजिबात येत नसल्याचे राजगुरूंनी पोलिसांना सांगितले होते व म्हणून त्यांना हिंदी येत असल्याचे सांगणारे साक्षीदार गोळा करण्याचा पोलिसांनी बराच प्रयत्न केला. पण काशीतील सर्व महाराष्ट्रीय प्रमुख मंडळींनी कानावर हात ठेवून सांगितले की आमचे बरोबर ते मराठीत बोलत असत व त्यांच्या गरजा फारच कमी असल्यामुळे बाजारहाट करीत असताना हिंदीत बोलत असलेले त्यांना पहाण्याचा प्रश्नच नव्हता. आम्ही त्यांना फक्त एक गरीब विद्यार्थी म्हणून ओळखत होतो.

शेवटी पोलिसांनी पैशाचा उपयोग करून एका गरीब माणसास साक्ष देण्यास तयार केले. त्या वेळच्या काशीतील तरुण मंडळीत त्या माणसास 'ढरप्या' म्हणून ओळखले जात असे. सरकारी खर्चाने हे ढरपेशास्त्री लाहोरास साक्ष देण्यास गेले; पण त्यांची साक्ष झाली नाही. कारण तोपावेतो राजगुरु व इतर क्रांतिकारकांचा भाईचारा व मनमुराद बोलणे इतर अधिकाऱ्यांनी ऐकले होते. साक्ष न देताच ढरपेशास्त्रीला सरकारी पैसा मिळाला व त्यातून शास्त्रीबोवा बदरीनारायणाची यात्रा आटोपून काशीस परतले.

ढरप्या सरकारी साक्षीदार झाला ही गोष्ट बऱ्याच मंडळींना खटकली व म्हणूनच की काय एका सायंकाळी ब्रह्मघाटावरून संध्या आटोपून शास्त्रीबोवा रामदुर्गकरांचे देवळाजवळ आल्यानंतर शास्त्रीबोवांचे उघड्या पाठीवर वेताचा असा झणझणीत फटका बसला की निदान पंधरा दिवस त्यांचे पाठीवर तो वळ होता. हे कसे व कोणी केले हे कोणासही समजू शकले नाही. मात्र या प्रकरणाची माहिती सध्या हयात असलेल्या निदान दोन मोठ्या माणसास असावी असा कयास आहे. पैकी एक सद्गृहस्थ एका मोठ्या शहरात – उत्तर प्रदेशाबाहेर – एका मोठ्या संस्थेचे वडे कार्यवाह आहेत व दुसरे गृहस्थ सिव्हिल सर्जनचे हुद्यावर आहेत.

महाराष्ट्र विद्यार्थी मंडळात असताना विज्ञानाचे शाखेच्या एका विद्यार्थ्याने संस्कृत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांबद्दल काही अनुदार उद्गार काढल्यामुळे राजगुरूंनी त्या आंग्ल-भाषा – विभूषित विद्यार्थ्याच्या श्रीमुखात झणझणीत चपराक दिली होती. तो

विद्यार्थी आता एक उद्योगपती असून हा प्रयोग पाहिलेले एक सेवानिवृत्त बडे सरकारी अधिकारी अद्याप हयात आहेत.

काशीत निवास होता तोवेळपावेतो राजगुरु व इतर क्रांतिकारक पूर्ण सुरक्षित होते याचे कारण काशीतील बोळ व गल्ल्या. तसेच त्या वेळेस तेथे राहाणारी प्रमुख महाराष्ट्रीय मंडळी यांना मुख्य श्रेय दिले पाहिजे.

इतकेच काय पण हुतात्मा चंद्रशेखर आझाद प्रयागच्या अलफ्रेड पार्कमध्ये वीरगतीस जाण्याचे तीन दिवस अगोदर काशीत बाबाराव सावकरांबरोबर एक रात्र मनमुक्त बोलून गेल्याचे सदर लेखकाने प्रत्यक्ष पाहिले आहे. अर्थात त्या वेळेस हा लेखक इंग्रजी दुसरीचा विद्यार्थी होता. आझादांचे हौतात्म्य कळल्यानंतर दिवसभर बाबा सावरकर कसे अश्रु गाळत होते हेही सदर लेखकाने पाहिले आहे.

अशा निःसीम देशभक्त वीरांना श्रद्धांजली देत असताना कानपूर स्टेशनवर पोलिसांचे कडे भेदून व त्या वेळचे डेप्युटी सुपरिटेंडेंट पोलीस रायबहाद्दुर टीकाराम यांचे डोळ्यास डोळा देऊन आझाद आपले अभिन्न सहकारी विश्वनाथ वैशंपायन यांचेसह कसे राजरोस बाहेर पडले हे वैशंपायन यांनी आपले पुस्तकांत नमूद केले आहे व हीच हकीगत अनेक वर्षानंतर स्वतः टीकाराम सुपरिटेंडेंट सी. आय. डी. यांनीही मला सांगितली होती. टीकाराम म्हणाले की "आझादांनी मला ओळखले होते व मी त्यांना ओळखले होते. पण तिकिट चेकिंग गेटजवळ मी काही हालचाल केली असती तर त्यांचे गोळीस बळी पडलो असतो व माझ्या गोळीस आझादही म्हणून हा गोळागोळीचा कार्यक्रम स्थगित राहिला." श्री. दादा वैशंपायन यांचेही जवळजवळ हेच म्हणणे होते.

अक्षरशः शिरकमल हातात घेऊन त्या वेळेस वावरणाऱ्या व देशाचे स्वातंत्र्याकरिता लढणाऱ्या वीर पुरुषांस आपले देशाने विसरावे हे मोठे दुर्दैव ! याच संदर्भात नुकत्याच प्रकाशित झालेल्या मुंबईच्या धर्मयुगच्या स्वाधीनता विशेषांकातील 'विस्मृत पीढी' या लेखातील शेवटचे वाक्य यथार्थ वाटले. सदर लेखात श्री. विनायक पुरोहित म्हणतात 'यदि पुराने क्रांतिकारियों के साथ सन् ४२ की तथा बादकी नयी पीढीके युवक-युवतियों का संबंध स्थापित हुआ होता तो ऐतिहासिक परिपेक्ष्य उनके समक्ष अधिक स्पष्ट होता और इस अलगावके कारण नयी पीढीने जो गलतियां की, वे शायद न हुई होती और शायर भारतकी आध्यात्मिक तथा आर्थिक दोनों प्रकारकी गरीबी का समाधान आज समीप होता."

थोडक्यात सारांश असा की, सन ४२ किंवा त्यानंतरच्या तरुण वर्गाला अगोदर स्वातंत्र्याकरिता बलिदान दिलेल्या स्वातंत्र्यवीरांची जर नीट माहिती किंवा त्यांनी प्रत्यक्ष भोगलेल्या हालअपेष्टांची कल्पना असती तर कदाचित नव्या पिढीच्या हातून होत असलेल्या चुका वा गफलती झाल्या नसत्या. तसेच समाजवादाचे ध्येयासही त्यागाचा मजबूत पाया मिळून आपले राष्ट्र मजबूत व कणखर झाले असते ! ◻ ◻ ◻

**चंद्रकांत वर्तक**



# एक दुपार —— भगूरची

शनिवार ता. सहा सप्टेंबर एकोणीसशे एकूणसत्तर उजाडतो. नेहमीसारखाच. पाऊस वगैरे तसाच. पण एखादा दिवस उजाडल्यानंतर मात्र त्या दिवसाचा आपला क्रम पालटवून टाकतो. अकल्पितपणे आणि अनपेक्षितपणे. तो दिवसच एक कथा बनतो आणि रेंगाळतही रहातो मनामध्ये कथेप्रमाणेच.

ह्या सहा सप्टेंबरच्या शनिवारचे असेच झाले. तो शनिवार आकाशात ढग ओथंबून रहावा तसा माझ्या मनात ओथंबून राहिला.

मी बारा वाजता रोजच्यासारखा कॉलेजात. जेवण वगैरे आटोपून. कॉलेजात पाय टाकतो न टाकतो तोच प्यून धावत आला. म्हणाला,

"सर, तुमचा फोन आहे."

श्री. शशिकांत टेंबे, संपादक—देशदूत ह्यांचेकडून कर्णोपकर्णी – "मी दुपारी कॉलेजात येतोय तुमच्या. तुम्ही आहात की नाही त्यावेळी ?"

"या. मी आहे. वाट पहातो."

बी. ए. चा वर्ग घेतला आणि प्रोफेसर्स रूमकडे येऊ लागलो. प्यूनने हातात चिठी कोंबली.

चिठीतला मजकूर – 'माणूस'चे संपादक दुपारी पावणे दोनला भेटायला येत आहेत. त्यांच्याबरोबर तुम्हाला भगूरला जायचय.

भले, म्हणजे दोन संपादक आपल्याला गाठणार.

खरोखरच दिल्या वेळेवर दोघे येतात. मग प्रिन्सिपॉलांच्या चेंबरमध्ये ओळखपाळख. चहापाणी. निघतो.

गाडीतून भगूर. मोटारीत बसल्यावर कळते – सावरकरांचे घर पाहायला जायचे आहे.

मी सावरकरांचे घर पाहिलेले नाही. भगूरला पाच सहा वेळा गेलो असेन पण योग आला नव्हता. धावत्या गाडीबरोबरच सावरकरांच्या आयुष्याचा एक धावता चित्रपट मनापुढून सरकतो.

भगूरला पोचल्यावर भगूरच्या शाळेतले जोशी आम्हाला मिळतात. आमच्या दिंडीत माजगावकर असतात. निफाडचे सभापती विनायकराव पाटील असतात. आणखीन टेंबे असतात. 'सकाळ'चे शरद बुरकुले, फर्ग्युसनमधला एस्. वाय्. बी. एस्सी. मधला मुकुंद देवधर आणि मी असेही आणखी असतो. भगूर गाव अल्याड पल्याड पसरले तरी एक लाऊडस्पीकर अख्ख्या गावाला पुरून उरावा एवढेच. त्यामुळे गावात नवे चेहेरे न सांगताच ओळखता येतात. आमच्या दिंडीकडे म्हणूनच गावातले लोक टकाटका पहात असतात.

शाळेपासूनच उजव्या अंगाला खाली दारणा भरभरून वाहत होती. शाळेच्या समोरच लंब रेषेत चालत जाऊ लागले की सावरकरांचे घर लागते. आज ते श्री. चव्हाण ह्यांच्या मालकीचे आहे. घर जणू दोन भागात विभागलेले आहे. त्यातल्या एका भागाचे पाखे चांगलेच उंच आणि दुसऱ्याचे सामान्य घराच्या उंचीइतके – काहीसे बैठे. दोन्हीमध्ये भिंत. ह्या बैठ्या भागातच सावरकरांचा जन्म झाला. श्री. चव्हाण घरी नव्हते पण कुणीतरी त्यांच्याकडचाच मुलगा होता. त्याने ते घर दाखवले. पाहता पाहता ते घर ऐंशी-नव्वद वर्षांतल्या – त्यापूर्वीच्या गोष्टी बोलू लागले. त्या घराच्या धमन्या जणू पुन्हा जाग्या झाल्या. धमन्यांच्या वाद्या ताणल्या आणि आठवणींच्या ओंकाराचा ध्वनी त्या घराच्या डमरूमधून उमटला. येथेच सावरकरांनी आपला पहिला सोऽहंचा ध्वनी दिला. घराच्या भिंतीभिंतींनी तो गोंदून ठेवला. त्या मुलांच्या ललाटरेषा जणू तिथे उमटल्या. त्याच्या रांगण्या-चालण्याने त्या घराला झालेला आनंद जणू तिथे जपून ठेवला गेला. पिंपळपान पुस्तकाच्या पानात जपावे त्याप्रमाणे. ह्या उंच पाख्याच्या घरात काही दिवसांपूर्वी शाळा भरत होती. पुढे काही दिवसांनी ह्या उंच पाख्याच्या घराची पडझड झाली आणि शाळा हलली. डागडुजी झाली पण शाळेऐवजी आता तिथे गुरांची शाळा भरते. जेथं लहानग्या सावरकरांच्या बाळलेण्यांचा वास पसरायचा तिथे चाऱ्याचा वास, गुरांच्या मुताचा वास, शेण्याच्या गवऱ्यांचा वास पसरलेला असतो. त्या उंच पाख्याच्या घरालाच एक प्रकारचा उदासपणा पांघरून बसलेला असतो. घर देखील जणू मनाने 'न सजसी ने परत...' असेच म्हणत असलेले. त्या घरात एकावेळी सावरकरांची ती फूटभर उंचीची अष्टभुजा देवीची मूर्ति असावयाची की जिच्या-पुढे त्यांनी आपली पारतंत्र्याबद्दलची पराकाष्ठेची चीड बोलून दाखवली – 'की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने' अशी ग्वाही देत देत 'तुजवीण जनन ते मरण'

अशा भावना व्यक्त करून पारतंत्र्याला झुगारून लावून देश स्वतंत्र करण्याची प्रतिज्ञा केली...पुढे घराचे नशीब फिरले, – सरकारची वक्र नजर, नागमोडी पावले फिरू लागताक्षणी अष्टभुजा देवी खंडोबाच्या देवळात आली. तिची वसती तेव्हापासूनच तिथे झाली. छोटचा घरातून जगाच्या ऐसपैस घरात, जिथे देवाचीच वसती नेहमी असते तिथे ती गेली. आज नवरात्रांत अजूनही चाकाच्या खुणेवर बोकडाला बसवून त्याचा बळी दिला जातो. तिचे घ्यान आम्ही पाहिले. उग्रमंगल असे ते ध्यान आपल्याला 'न्याय्य तेच करणार व अन्याय्य ते धुडकावून लावणार' ह्याची प्रचीती देते. देवीच्या चेहऱ्यावरचे अष्टसात्त्विक भाव आपल्याला उल्हसित करतात. हातातली तरवार – धनुष्यबाण शरणार्थीला, आर्ताला अभय देतात तर जुलूम करणाऱ्याला मृत्यूचे भय निर्माण करतात. देवीचे ध्यान पाहिल्यावर इतिहासाच्या वाचनाने लेण्यातल्या शिल्पाप्रमाणे देशभक्तीचे शिल्प अंतःकरणावर कोरणारे सावरकर मनापुढे, नजरेपुढे आले – ह्या देवीच्या चेहऱ्यावरचे भाव त्यांच्याशी कोणता संवाद करून गेले असतील ह्याचीच कल्पना मन करू लागले. आणि मग मन पराकाष्ठेचे असे उदास झाले – भरून आले.

गावातल्या लोकांना, शाळेतल्या मुलांना आपल्याभोवती खरोखरी कोणते चैतन्यमय वातावरण आहे ह्याची जाणीव आहे आणि अजिबात नाहीसुद्धा. अशा जाणाराच भणंग वेडा ठरायचा. ह्याच तंद्रीत वाचनालयापाशी आलो आणि तेथल्या दरवाजापाशीच एक देखणा पण आता सत्तरीपलीकडे गेलेला गृहस्थ भेटला. नाक कसे तरतरीत, वर्णाने गोरा, डोळे घारेच – वाण एकंदर कोकणस्थी पण बाह्यदृष्टयाच; खरा वाण शहाण्णव कुळीतला. बोलणे खणखणीत, शुद्ध – जुना चांदीचा रुपया वाजे तसे आपणहून मनात निराळाच ध्वनी निर्माण करणारे. उत्सुकता नसलेल्याच्या मनातही उत्सुकता निर्माण करणारे. त्याने आपल्या घरीच आमच्या दिंडीला नेले. चहा दिला. नाव सांगितले – चिमणराव बाजीराव देशमुख – जन्म तारीख दोन ऑगस्ट अठराशे अठ्ठ्याण्णव. देशमुख म्हणाले – "सावरकर घराण्याची शेतीची जमीन आणि आमची शेतीची जमीन ह्यांत फक्त बांध – बाकी शेजारी. म्हणजे बांधभाऊच."

ह्या माणसाला सावरकरांबद्दल प्रेम. सावरकर कलकत्त्याच्या महासभेच्या अधिवेशनाला जायला निघाले तर हे स्टेशनवर त्यांना भेटले. हारतुरे केले. सावरकर सुटल्यावर भगूरला आले तेव्हा त्यांच्याबरोबर अस्पृश्योद्धार चळवळीत भाग घेतला. स्वातंत्र्याच्या चळवळीचे विमुक्त वारे अंगातून गेलेले त्यामुळे तीसची चळवळ, बत्तीसचा सत्याग्रह, बेचाळीसचा लढा अंगावर घेतलेला – तिन्ही वेळा तुरुंगाची दारे आपल्यासाठी खोलायला लावलेली! आज शेती कुळांकडे गेलेली – दारिद्र्य पत्करलेले (पलीकडे बाजेवर कुणीतरी मरगळून गेलेले माणूस झोपलेले दिसतच होते.) पण त्याबद्दल चीड नाही, उद्विग्नता नाही राग अगळाच तर

स्वातंत्र्याचा अट्टाहास ज्या स्वप्नांना उरापोटी सांभाळून जन्मभर केला त्या स्वप्नांचा चुराडा झाल्याबद्दलचाच. गेल्या बावीस वर्षांत चाके निराळ्याच गतीने फिरताहेत त्याचीच चीड. सामान्य माणसाची बूज ह्या स्वराज्यात राखली जात नाही हीच काय ती व्यथा. ह्यासाठीच जीभ तिखट झालेली. वशिलेबाजी, तोंडपुजे-पणा ह्याचा कमालीचा तिटकारा करणारी. सावरकर ह्या विषयाने स्वारी काहीशी फुलली. चिमणराव बाजीरावांचा थोडासा वेळ त्या 'पूर्व दिव्या'च्या रम्य आठवणीत छान गेला. सावरकरांच्या नांवाने गावात काहीतरी व्हायला पाहिजे ह्या भावनेने भरून गेलेला; पण पुतळा नको असे त्यांनी स्वच्छ बजावले. पुतळ्यासाठी खर्च होणाऱ्या पैशांचा उपयोग पुतळ्यापेक्षा दुसऱ्या कशात तरी करता येईल असे ह्या माणसाने सुचवले. आज सावरकरांच्या नावाने गावात बखळ आहे – तेथे बाजार भरतो हल्ली. तेथेही काही करता येईल असा त्यांचा विश्वास. गाव सश्रद्ध आहे – सावरकर नामक माणसाची मते व दृष्टी कशीही असो – जिवाची कुरवंडी रचणारा सावरकर आपल्या गावचा आहे ह्याची अप्रूकता साऱ्या गावाला आहे अशी त्यांची श्रद्धा !

त्यांच्याशी बोललो आणि उदास झालेले मन त्यांच्या कणखरपणाच्या बोलण्याने भारावून गेले – विस्मयचकित झाले. आज कणा तुटलेल्या स्थितीत माणसे जग-ताहेत – त्यांत अशी परखड वाणीची माणसे भेटली म्हणजे कसे निराळेच होते – अंतरीची ओल जाणवते. मनातून देशमुखांना दुवा दिला.

त्याच तंद्रीत असताना गाडीने जराशाने भगूर सोडले होते.

आणि मग लक्षात आले होते की 'न कर्त्या शनवारा'ने एक वेगळाच चमत्कार करून दाखवला होता म्हणून.

□ □ □


**शिलंगणाचं सोनं**

**आवृत्ती : तिसरी**

ब. मो. पुरंदरे

किंमत : तीन रुपये

राजहंस प्रकाशन

अनिल हवालदार



# एम्. आर. आचरेकर

## एक स्केच

" जीवनासाठी मी माझी कला पहिल्यापासून राबवली. भुकेल्या पोटी कलासाधना करण्याची माझी कधीही इच्छा नव्हती आणि आपल्या लहरीखातर आपल्या बायका–मुलांचे हाल व्हावेत असे मला कधीही वाटले नाही..." अगदी पहिल्या भेटीत हे प्रांजल आणि परखड विचार मांडणारी व्यक्ती म्हणजे एम्. आर. तथा मुरलीधर रामचंद्र आचरेकर. चित्रसृष्टीतील विख्यात कला–दिग्दर्शक म्हणून माझ्या पिढीला ज्ञात असलेले. राज कपूरच्या महत्त्वाकांक्षी चित्रपटांच्या कला-दिग्दर्शनाची धुरा कुशलतेने सांभाळणारे कला-दिग्दर्शक म्हणून ख्याती असलेले.

परंतु मागच्या पिढीला ठाऊक आहेत ते चित्रकार एम्. आर. आचरेकर. सुंदर सुंदर पेंटिंग्ज काढणारे...पोर्ट्रेट करण्यात हातखंडा असलेले...जे. जे. स्कूल ऑफ् आर्टचे प्राचार्यपद भूषविणारे...हिंदुस्थानातल्या राजेरजवाड्यांच्या प्रसादांना आपल्या कुशल कुंचल्यातल्या कलाकृतींनी सजविणारे चित्रकार एम. आर. आचरेकर।

त्यांच्या आठवणीतले त्यांचे पहिले चित्र त्यांच्या वयाच्या दहाव्या वर्षी रेखाटलेले. सहज खेळता खेळता कागदावर रेषा काढायचा त्यांना छंद जडला आणि त्यातून 'राधा-कृष्ण' हे चित्र उमटले. ते प्रसिद्ध झाले – त्याचे कौतुक झाले आणि तेव्हापासून हाती घेतलेला कुंचला आत्ता या घटकेपर्यंत त्यांना दिसलेले जीवन – त्यांना भेटलेली माणसे – समोरच्या कॅन्व्हासवर उतरवीत आहे.

आत्तापर्यंत सात वेळा परदेशवारी करून चीन – ऑस्ट्रेलियाखेरीज जगातल्या बहुतेक देशांना भेटी देऊन आलेल्या एम्. आर. आचरेकरांचा जन्म १४ नोव्हेंबर १९०७ रोजी एका मध्यमवर्गीय कुटुंबात मुंबईतल्या एका चाळीत झाला. त्यांचे वडील त्या वेळी बी. बी. अँड सी. आय. मध्ये नोकरीला. घरच्या परिस्थितीने वयाच्या चौदाव्या वर्षापासून एम्. आर. द्रव्यार्जन करायला लागले. जे. जे. स्कूलच्या परीक्षा दिल्या. पुन्हा शिक्षण सोडले. प्रेस घातला. तो पुन्हा विकला. सहा वर्षांचा अवधी गेल्यावर पुन्हा जे. जे. मध्ये दाखल झाले. आणि गंमत म्हणजे पोर्ट्रेट काढण्यात पुढे ख्याती मिळविणारे आचरेकर त्या वेळी त्या विषयात चक्क नापास झाले. अस्मिता दुखावली गेली. रौप्यपदक मिळवून त्यांनी त्या पराभवाचा वचपा काढला.

एव्हाना ध्यास लागला होता विलायतेचा. त्या वेळी विलयतवारी करून आलेल्या लोकांना हिंदुस्थानात मान मिळायचा. चार पैसे अधिक मिळायचे. आचरेकरांनी कमर्शियल आर्टिस्ट म्हणून काम करता करता धडपड करून तीन हजार रुपये गोळा केले आणि विलायतेच्या बोटीवर १९३२ साली पहिले पाऊल ठेवले. त्या वेळी विलायतेच्या बोटीचे तिकीट फक्त ४०० रु. होते म्हणे आणि ते विलायतेला पोहोचले तेव्हा त्यांच्या खिशात पुंजी होती अवघ्या ३३ पौंडांची.

तेथील रॉयल कॉलेजात त्यांनी नाव दाखल केले. दोन वर्षांच्या वास्तव्यात त्यांनी अभ्यास केला. जगातील मोठमोठ्या चित्रकारांच्या कलाकृती नजरेखालून घातल्या. भारतीय कलेचे स्थान फार मोठे आहे ह्याची जाणीव त्यांच्या गोऱ्या प्राध्यापकाने त्यांना करून दिली ... आणि डिप्लोमा न घेताच कलेची नवी वास्तववादी दृष्टी घेऊन आचरेकर मायभूमीला परत आले विलायतेच्या मुक्कामात त्यांनी केलेले उल्लेखनीय कार्य म्हणजे पहिल्या भारतीय गोलमेज परिषदेचे चित्रण. दुसरी कामगिरी म्हणजे 'रूपदर्शन' या पुस्तकाचे लेखन. पाश्चात्य दृष्टिकोनातून भारतीय चित्रकलेचे मनोरम दर्शन त्यांनी या पुस्तकातून सगळ्या जगाला घडविले.

हिंदुस्थानात आल्यावर अनेक संस्थानिकांच्या प्रासादांमधून आचरेकरांनी काम केले. पाश्चात्य पाहुण्यांनी आपल्याजवळचा कलासंग्रह पाहून खूष व्हावे एवढीच बहुतेक संस्थानिकांची अपेक्षा असायची. कलेतली खरीखुरी जाण असणारे विरळाच. त्यामुळे त्या काळी चित्रकारांना एकापरीने आवश्यक ते स्वातंत्र्यही मिळत असे. पण

स्वातंत्र्य आले आणि संस्थाने लयाला गेली. मधला काळही युद्धाचा गेला होता. जीवनकलहाला तोंड देणे आचरेकरांना कठीण जात होते. त्यांनी काढलेली उमर-खय्यामची चित्रे दिल्लीच्या एका हॉटेल-मध्ये लावलेली होती. ती सुप्रसिद्ध चित्रपटनिर्माते – दिग्दर्शक करदार यांनी पाहिली. त्या चित्रांचा चित्रकार मुंबईमधलाच आहे हे त्यांना समजताच त्यांनी मुंबईत आचरेकरांचा शोध घेतला. आचरेकरांनी चित्रपटधंद्यात कलादिग्दर्शक व्हावे म्हणून त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. पण आचरे-करांच्या मनाला पटेना. दिवस चालले होते. करदारमियाँनी त्यांना सरळ पगार सुरू केला होता. दोन-तीन महिने उलटले आणि आचरेकरांनाच राहवेना. त्यांनी कलादिग्दर्शन पत्करले. त्या वेळी १९४८ साल होते. त्या चित्रपटाचे नांव होते 'शहाजहान' आणि स्वरसम्राट सैगलचा तो शेवटचा चित्रपट ठरला.



प्रदर्शनातील एक पेंटिंग

वयाची चाळीशी उलटून गेल्यानंतर चित्रसृष्टीत शिरलेले आचरेकर गेली वीस वर्षे त्या धंद्यात काम करूनही अलिप्त मनाने वावरतात याची त्यांच्याशी बोलताना प्रचीती आली. त्यांना आपल्या पहिल्या चित्रपटाचे नाव आठवेना...पण त्यांच्या-तल्या कला-दिग्दर्शकाला 'ताजमहाल'चा संबध आठवत होता... त्यांच्यातल्या कलाकाराला सैगलचे नाव आठवत होते. बासष्टीतल्या या 'कलायोग्या'ची ही मनो-रचना मला वेधक वाटली.

आचरेकर हे वास्तववादी चित्रकार म्हणून ओळखले जातात. चित्रकाराला स्वातंत्र्य हवे याबद्दल त्यांचे दुमत नाही, पण या स्वातंत्र्यालाही एक शिस्त पाहिजे असे त्यांना वाटते. त्यांचे कलाशिक्षण एका विशिष्ट शिस्तीमधून झाले आहे. कला-क्षेत्रातले पहिले नियम पाळून नंतरच त्यांनी स्वतःच्या अभिव्यक्तीमध्ये स्वातंत्र्य घ्यायला सुरुवात केली. मॉडर्न आर्टसंबंधी कौतुक असूनही त्यातील अतिरेक त्यांना पसंत नाही. मॉडर्न आर्टमधील स्वातंत्र्य आता वेडाच्या थराला गेले आहे असे ते म्हणाले. उदाहरणादाखल त्यांनी एक किस्सा सांगितला– "स्वीडनमध्ये एका

वेड्याच्या इस्पितळात वेड्यांना चित्रे काढायला सांगितली. ती चित्रे मॉडर्न आर्ट-मधील सर्वोत्कृष्ट नमुने ठरले !" चित्रनिर्मितीमागे अभ्यासाची गरज आहे आणि नेमका त्याचाच मॉडर्न आर्टमध्ये अभाव आढळतो. स्वतःच्या कलेबद्दल बोलतानाही आचरेकर प्रांजलपणे कबूल करतात की, काळानुरूप त्यांच्या कलेत झालेला बदल अनेकवेळा त्यांना स्वतःला आवडत नाही. कलेतील उत्क्रांती त्यांना आवडते, पण क्रांती नकोशी वाटते.

नट किंवा कवी जसा जन्मावा लागतो, तसेच चित्रकारही जन्मावाच लागत नाही काय ? असा मी सवाल केला तेव्हा आचरेकरांनी अर्धा होकार दिला. शिस्त-शीर शिक्षण घेतले नाही, चित्रकलेचे शिक्षण देणाऱ्या विद्यालयांचे अस्तित्व नसले, तर मोठे अराजक माजेल असे त्यांना वाटते. तंत्रावर प्रभुत्व मिळविल्यानंतर स्वयं-स्फूर्तीने चित्रकार जेव्हा त्या मर्यादा ओलांडतो तेव्हा त्याचे त्या कलेवर प्रभुत्व निर्माण होत असते. त्याची स्वतःची अशी एक खास शैली निर्माण होत असते.

प्रत्यक्ष शिकार करण्यापेक्षा शिकार शोधण्यात जशी मजा असते, तसेच कागदा-वर काढलेल्या पहिल्या रेषेपासून चित्र पुरे होईपर्यंतचा काळ हा चित्रकाराच्या दृष्टीने सर्वांत आनंददायी काळ असतो असे आचरेकरांचे मत आहे. मनातल्या उर्मी समोरच्या कॅन्व्हासवर उतरवून होतात त्याक्षणी त्या चित्रामध्ये आणि चित्रकारात एक प्रकारची अलिप्तता निर्माण होते. त्याची नजर नव्या विषयाकडे केव्हाच वळ-लेली असते. एखादी कथा लिहायला घेताना लेखकाच्या कळत नकळत तिची वळणे जशी बदलत जातात त्याप्रमाणे हाती घेतलेल्या चित्रविषयाला अखेरीस कोणती कलाटणी लागेल हे सांगता येत नाही; आणि हा जो अनिश्चिततेचा काळ असतो तोच कलात्मक धुंदीचा काळ. आचरेकरांची विचारधारा ही अशी आहे.


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, अजूनही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (वी. एन.) पो. कतरीसराय (गया)

सध्या आचरेकरांनी एका नव्याच दालनात प्रवेश केलाय. मध्यंतरी पर्यटन खात्यातर्फे भरलेल्या प्रदर्शनाची त्यांनी आखणी करून दिल्यापासून त्यांच्याकडे वेगवेगळ्या प्रदर्शनांच्या कामांची रीघ लागली आहे. त्यांच्या कलेला आता लोकशाही सरकार-दरबारातही मान्यता मिळाली आहे. गेल्याच वर्षी ते पद्मश्री किताबाचे मानकरी ठरले आणि आत्ता या घटकेला गांधी-जन्मशताब्दीच्या निमित्ताने भरणाऱ्या आगामी प्रदर्शनाच्या पूर्वतयारीत ते मग्न आहेत. मुंबईनजीक होणाऱ्या चित्रपट-नगरीच्या संबधातील कामही त्यांच्याकडे येऊ घातलेले आहे.

परंतु या कलावंताच्या मनात इतकी वर्षे धीर धरून राहिलेला 'जिप्सी' आता जागा झालाय. ऐहिक कमाईमध्ये कुठे थांबायचे त्याची लक्ष्मणरेषा आचरेकरांनी पूर्वीच ठरविल्याने त्यांच्या कृतार्थ जीवनाची वाटचाल सुरू झाली आहे. स्वतःच्या हौसेखातर त्यांनी एक नाटकही लिहिलेय. चित्रकलेसंबंधात तीन-चार मौलिक पुस्तकांची पूर्वतयारी त्यांनी करून ठेवलेली आहे. सुमारे पंधरा वर्षांपूर्वी भारतीय चित्रपट प्रतिनिधी मंडळातून ते अमेरिकेला जाऊन आले. तो दौरा (Skyscrapers and flying Gandharvas) या सुरेख सचित्र इंग्रजी पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाला आहे. त्यांच्या पेन्सिलीची करामत आणि मिस्कील अवलोकनातून निर्माण झालेली खुसखुशीत शैली वाचकाला मोहविणारी आहे. ते पुस्तक वाचताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली—भारतीय संस्कृती, अभिजात भारतीय साहित्य या माणसाच्या मनी मानसी पक्के भिनलेले आहे. म्हणूनच अमेरिकेतल्या गगनचुंबी इमारती पहायला गेलेल्या भारतीय चित्रसृष्टीतल्या कलाकारांमध्ये त्यांना 'गंधर्व' दिसतात. आकाशाला उंचच उंच भिडणारी इमारत पाहताना दहीहंडी फोडणाऱ्या कोकणातल्या बाळूंचा 'पिरॅमिड' त्यांना दिसतो. फ्रॅंक काप्रासारख्या प्रसिद्ध माणसाची प्रस्तावना मिळालेले आचरेकरांचे हे पुस्तक वाचताना जगातल्या कलाक्षेत्रामधील त्यांच्या ओळखीच्या व्यक्तींचे भांडार किती संपन्न आहे याची साक्ष मिळते.

शांतिनिकेतनसारखी चित्रकलेचे शिक्षण देणारी एक संस्था स्थापण्याचे स्वप्न आचरेकरांच्या डोक्यात मध्यंतरी घोळत होते. पण त्यांच्यातल्या वास्तववादी मनाला त्या योजनेतील अव्यवहार्यता दिसली आणि तो विषय त्यांनी मनात मिटवून टाकला. आता त्यांना त्यांच्या मनासारखे मनसोक्त जगायचे आहे. लहर येईल तेव्हा आरटे गावच्या त्यांच्या खोपटात त्यांच्या खास मित्रमंडळींना घेऊन ते जातात. मनसोक्त गप्पा मारतात. त्या गप्पांमध्ये पान जमविण्याचा कार्यक्रम चालूच असतो. परदेशवारीचा खास हव्यास आता त्यांच्या मनात नाही. उलट उद्या गोव्याच्या बोटी सुरू झाल्या की, आपल्या पत्नीला घेऊन हा कलावंत सागरसफरीला निघेल...वाटेत मनाला भावेल त्या बंदरात चक्क उतरेल...आणि अंतःकरणाला भिडेल ते आपल्या कुंचल्यातून कॅन्व्हासवर साकार करण्यात दंग होऊन जाईल...!

□ □ □

२७ सप्टेंबर १९६९



# चकवा

विनय कुबेर

वाईट हवामानामुळे रस्ता चुकून डंकनचे विमान रशियात गेले असावे व अपघात होऊन कोसळले असावे असा तर्क अमेरिकन अधिकाऱ्यांनी केला.

पण काहींना मात्र यात वेगळाच संशय आला......

आधुनिक काळातील दळणवळणाची साधने जेव्हा उपलब्ध नव्हती त्या काळी प्रवास पायी अगर बैलगाडीने चाले. असे एकटे दुकटे प्रवासी वाट चुकून चकव्यात सापडल्याच्या हकीकती जुन्या माणसांच्या तोंडून ऐकायला मिळतात. अलीकडे असले प्रकार घडल्याचे उदाहरण सापडत नाही. परंतु आधुनिक काळात वादळी हवामानाला तोंड देऊन, आकाशातून लांबलांबचे प्रवास करणारी विमाने वाट चुकून डोंगरदऱ्यात कोसळल्याची उदाहरणे बरीच सापडतात. कित्येक वेळा या विमानांच्या अवशेषांचा ठावठिकाणासुद्धा अनेक दिवस लागत नाही.

येथे वर्णन केलेली घटना १९५८ मधील आहे. रशिया-अमेरिका यांच्या दरम्यान

दुसऱ्या महायुद्धानंतर सुरू झालेल्या थंड्या युद्धाची तीव्रता यावेळी वाढतच चालली होती. अमेरिकेची टेहेळणी विमाने वाट चुकून रशियन प्रदेशांत घुसल्याची अनेक उदाहरणे वारंवार घडत. ही विमाने रशियात कोसळत अगर रशियन सैनिक त्यांना खाली उतरण्यास भाग पाडत.

तुर्कस्तानमध्ये अॅडना, ट्रॅबझान व व्हान या शहरी अमेरिकन विमानदलाचे तळ होते. त्यांच्या दरम्यान बरेच वैमानिक दळणवळण सुरू असे. विमानांच्या हालचाली सुरळीत चालाव्यात यासाठी एक खास रेडिओ यंत्रणा बसविलेली होती. तळावरील ऑपरेटर व उड्डाण करणारे विमान यांच्यात उड्डाण सुरू असता आवश्यक त्या संदेशांची देवाणघेवाण रेडिओवरून चाले. या संदेशलहरींची कंपनसंख्या, लांबी व शक्ती यांची वेळोवेळी तपासणी करून यंत्रणेची कार्यक्षमता अजमाविण्यासाठी खास विमानेही नेमून दिली होती. विमानाचे काम वेळापत्रकानुसार सुरू असे.

२ सप्टेंबर १९५८ रोजी ही कामगिरी कॅप्टन डंकन या वैमानिकाकडे होती. खास इलेक्ट्रॉनिक यंत्रसामुग्री बसविलेले सी १३० जातीचे ४ इंजिनांचे एक भले मोठे वाहतूक विमान त्याच्या दिमतीस होते. शिवाय ४ तज्ञ अधिकारी व १२ इतर मदतनीसही विमानात होते. स्वसंरक्षणासाठी विमानात कसल्याही प्रकारचे शस्त्र बसविलेले नव्हते.

डंकनचे विमान धावपट्टीवरून धावत असता ते रखडत अडखळत असल्याचा भास तळावरील सैनिकांना झाला. परंतु त्याचे उड्डाण सुरळीत पार पाडले. थोड्याच वेळात ते ट्रॅबझानच्या दिशेने दिसेनासे झाले. त्यानंतर विमानातील रेडिओ ऑपरेटरनी ट्रॅबझान येथील रेडिओशी संदेशांची देवाणघेवाण सुरू केली. मार्गावरील हवामान व विमानाचे वेळोवेळीचे स्थान याबद्दलची माहिती ट्रॅबझान तळाला सांगितली जाऊ लागली.

त्यांच्या उड्डाणाचा मार्ग पूर्वनियोजित होता. प्रथम ते अॅडनाहून थेट ट्रॅबझानपर्यंत जाणार होते. त्यानंतर उजवीकडे वळून रशिया सरहद्दीला समांतर प्रवास करीत व्हान विमानतळावर उतरणार होते. या नियोजित मार्गापासून रशियन सरहद्द प्रत्येक ठिकाणी १०० मैलाहून दूर राहणार होती. विमानाची ट्रॅबझानला पोचण्याची नियोजित वेळ ११–४२ होती.

मार्गावरील हवामान वादळी होते. विमान सुमारे २५००० फूट उंचीवरून उडत असावे. ढगांच्या दाट पडद्यामुळे जमीन दिसत नव्हती. ११–४२ च्या पूर्वी केव्हातरी विमानाकडून ट्रॅबझान तळाला मिळणारे संदेश बंद पडले. त्यानंतर विमानाकडून एकही संदेश आला नाही. ते व्हानला पोचल्याची बातमीही मिळाली नाही. विमान अजिबात बेपत्ता झाले!

त्यानंतर १० दिवसपर्यंत त्याबद्दल काहीच माहिती मिळू शकली नाही. विमानाचे अवशेषही सापडले नाहीत. अमेरिकन अधिकारी बुचकळ्यात पडले. डंकन वाट


चुकून रशियन हद्दीत गेला की काय अशी त्यांना शंका आली. म्हणून त्यांनी रशियन प्रतिनिधीकडे त्याबद्दल चौकशी केली. प्रथम त्यांनी दाद दिली नाही. अमेरिकन सरकारने पुन: पुन: विनंती केल्यावर खालीलप्रमाणे माहिती देण्यात आली – २ सप्टेंबर रोजी एका अमेरिकन विमानाने तुर्कस्तानची सरहद्द ओलांडून रशियन प्रदेशात अतिक्रमण केले. सोवियत आर्मेनियामध्ये, सरहद्दीपासून २५ मैल दूर अलॅगॉझ पर्वतात हे विमान कोसळले. विमानाच्या छिन्नभिन्न अवशेषात फक्त ६ मृत देह सापडले – उरलेल्या ११ व्यक्तींबद्दल रशियाने संपूर्ण मौन पाळले !

रशियन अधिकाऱ्यांनी २४ सप्टेंबरला तुर्कस्तान व रशियाची सरहद्द असलेल्या अरॅक्स नदीवरील एका पुलावर सहा शवपेटिका अमेरिकनांच्या स्वाधीन केल्या. रशियन सरकारच्या मते या प्रकरणाचा शेवट झाला.

वाईट हवामानामुळे रस्ता चुकून डंकनचे विमान रशियात गेले असावे व अपघात होऊन कोसळले असावे असा अमेरिकन अधिकाऱ्यांचा अंदाज होता. कारण विमानाच्या उड्डाणप्रसगी काळ्या दाट ढगाचे अनेक थर विमान व जमीन यांच्या दरम्यान होते. शिवाय त्याचवेळी जोरदार वाऱ्याचा एक प्रवाह पश्चिमेकडून पूर्वेकडे वहात होता. जमिनीवरील खाणाखुणा दिसत नसल्यामुळे विमान पूर्वेकडे भरकटणे शक्य होते. या दोन्ही अडचणी निर्माण झाल्या तरीसुद्धा डंकनसारखा वाकबगार वैमानिक नियोजित मार्गावरून तब्बल १२० मैल दूरवर भरकटावा ही गोष्ट मात्र आश्चर्यकारक होती. या प्रकरणांत कोठे तरी पाणी मुरते आहे असा संशय अमेरिकन अधिकाऱ्यांना येऊ लागला !

एकाएकी त्यांना दोन महिन्यापूर्वी घडलेल्या याच स्वरूपाच्या घटनेची आठवण झाली. २७ जूनला नऊ व्यक्तींसह जवळजवळ डंकनच्याच मार्गाने प्रवास करणारे, सी ११८ जातीचे वाहतूक विमान, अशाच रहस्यमय रीतीने बेपत्ता झाले होते. त्याचा वैमानिक मेजर लाईल्स होता. दुसऱ्या दिवशी रशियन अधिकाऱ्यांकडे त्याबद्दल चौकशी केल्यावर त्यांनी सांगितले – विमानाने सरहद्दीचे उल्लंघन करून रशियन नभांगणात प्रवेश केला. त्यामुळे रशियन विमानांनी सोवियत आर्मेनियातील सेरवान सरोवराजवळ त्यास खाली उतरण्यास भाग पाडले. विमान पेटून जळून गेले. तरी बचावलेल्या सर्वच्या सर्व म्हणजे ९ अमेरिकनांना पकडण्यात आले.

या ९ जणांची रशियाने दहा दिवसानंतर सुटका केली. तुर्कस्तानात परतल्यावर त्यांच्या तोंडून खरी हकीगत अमेरिकन अधिकाऱ्यांना कळली. अॅडना व ट्रॅबझान यांच्या दरम्यान मेजर लाईल्सचे विमान एका चक्री वादळांत सापडले असे त्याने सांगितले. पुढे तो म्हणाला, "आम्ही वादळातून बाहेर पडतो न पडतो तोच दोन रशियन मिग विमानांनी आमच्यावर चढाई केली. आमचे विमान कसल्याही आक्रमक कारवाईत सहभागी नाही हे दर्शविण्यासाठी मी विमानाची चाके बाहेर सोडली. तरीसुद्धा मिग विमानांनी आमच्यावरील गोळीबार थांबविला नाही.




डंकनच्या विमानाचा मार्ग

अखेर आमचे विमान पेटून खाली कोसळू लागले. मला व माझ्या सहकाऱ्यांना हवाई छत्रीच्या सहाय्याने जीव वाचविण्यासाठी विमानाबाहेर पडणे शक्य झाले नाही. अखेर मी आटोकाट प्रयत्न करून विमान सावरले व ते जमिनीवर एका सपाट पट्टीवर उतरविले. आम्ही सर्वांनी ताबडतोब बाहेर उड्या टाकल्या. अर्ध्या एक मिनिटातच आमच्या विमानाचा स्फोट झाला. आम्ही रशियन प्रदेशात कसे काय उतरलो ते मला समजले नाही.

लाईन्सच्या सहकाऱ्यांनी एक सूचक गोष्ट सांगितली. विमान चक्रीवादळातून बाहेर पडल्यानतर रेडिओ मार्गदर्शकाची सूचिका पूर्वीच्या दिशेपेक्षा थोडी वेगळी दिशा दर्शवीत असल्याचे त्यांना आढळले होते. डकनच्या विमानाचीही अशीच गत झाली असावी.

येथे रेडिओ मार्गदर्शक यत्र ( Radio-Direction Finder–RDF ) या यंत्राची माहिती देणे आवश्यक ठरते. नावाप्रमाणेच हे यंत्र विमानाला रेडिओच्या सहाय्याने हवा तो मार्ग दाखविते. घरगुती रेडिओप्रमाणेच याच्यावरही पाहिजे त्या कंपनसख्येच्या लहरी ऐकता येतात. यत्रावरील तबकडीवर फिरणारी सूचिका यत्रातून ऐकू येणाऱ्या रेडिओ लहरींची दिशा दर्शविते. प्रत्येक विमानतळावरील कट्रोल टॉवरमधील रेडिओ प्रक्षेपक ठराविक लांबीच्या व कंपनसंख्येच्या ( Frequency ) रेडिओ लहरीवर त्या त्या तळाच्या नावाची सक्षिप्त अक्षरे तारायत्राच्या भाषेत (Morse Code) प्रक्षेपित करीत असतो. विमानातील रेडिओ मार्गदर्शक या लहरी ग्रहण करून वैमानिकाला पाहिजे त्या शहराची दिशा दर्शवित राहतो. ढगांच्या पडद्या-

मुळे जमिनीवरील खाणाखुणा दिसत नसल्या अगर रात्रीची वेळ असली तरी वैमानिकाला आवश्यक त्या दिशेने जाणे त्यामुळे शक्य होते. विमानतळावरून प्रक्षेपित होणारे संदेश वैमानिक व त्याच्या सहकाऱ्यांना त्यांच्या कानावर बसविलेल्या इयरफोनमधूनही ऐकू येत असतात. विमानतळ जसजसा जवळ येईल तसतशी या संदेशांची तीव्रता व स्पष्टपणा वाढत जातो आणि विमानतळ जवळ आल्याचे कळते.

डंकनचे विमान का वाट चुकले याचा शोध घेण्यासाठी आठ सप्टेंबर रोजी खास इलेक्ट्रॉनिक यंत्रे बसविलेले एक शोधक विमान डंकनच्याच मार्गाने (ट्रॅबझान मार्गे) व्हानकडे निघाले. या विमानात जरी रेडिओ मार्गदर्शक यंत्र होते, तरी त्याचा प्रवास जमिनीवरील खाणाखुणा व रडारच्या सहाय्याने चालला होता.

या विमानाचा प्रवास ट्रॅबझानच्या दिशेने सुरू झाला. रेडिओवरून ट्रॅबझान तळाचे संदेश ऐकू येत होते. रेडिओ मार्गदर्शक यंत्राची सूचिकाही योग्य ती दिशा दर्शवित होती. परंतु थोड्याच वेळाने ट्रॅबझानचे संदेश अस्पष्ट होऊ लागले व त्यानंतर पुन्हा ते पूर्वीपेक्षा अधिक स्पष्ट येऊ लागले. हे नंतरचे संदेश कोठून तरी दुरून (बहुधा रशियातून) येत असावेत असा संशय विमानातील अधिकाऱ्यांना आला. कारण त्यांना ट्रॅबझान तळ मागे पडल्याचे स्पष्ट दिसले. तरीही रेडिओ मार्गदर्शकाच्या सूचिकेने दिशा बदलली नाही. ट्रॅबझान मागे पडल्यावर सूचिकेने पूर्वीच्या विरुद्ध दिशा दाखवायला पाहिजे होती! तसे घडले नाही त्या अर्थी खऱ्या रेडिओ लहरींपेक्षा शक्तीमान पण त्याच कंपनसंख्येच्या लहरी मूळच्या लहरींना झाकून टाकीत असाव्यात असा निष्कर्ष त्यांनी काढला. या बनावट लहरी कोठून येतात ते शोधून काढण्याचे अधिकाऱ्यांनी ठरविले. रेडिओ मार्गदर्शकाची सूचिका

लहान मुलांसाठीं उत्कृष्ट औषध!
डोंगरे
बालामृत
के. टी. डोंगरे अॅण्ड कं. प्रा. लि. मुम्बई-१.

ट्रॅबझान तळाची म्हणून जी दिशा दर्शवित होती त्या दिशेने सरळ रेषेत विमानाने उड्डाण सुरू ठेवले. आता ते रशियन सरहद्दीच्या जवळ जवळ जाऊ लागले. कायद्या-प्रमाणे सरहद्दीच्या जितक्या जवळ जाता येते तितके ते जवळ गेले. काळ्या समुद्राच्या किनाऱ्यावरील या ठिकाणाहून त्यांना रशियन प्रदेश स्पष्ट दिसत होता. सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक यंत्रांनी तपासणी करता त्यांना आढळले की पोटी व बाटुमी या दोन रशियन शहरांच्या मधील एका ठिकाणावरून बनावट रेडिओ संदेश प्रक्षेपित केले जात होते. ही दोन्ही शहरे काळ्या समुद्राच्या किनाऱ्यावर वसली आहेत. ॲडना ते ट्रॅबझान या वैमानिक मार्गाची रेषा पुढे वाढविल्यास ती पोटी व बाटुमी यांच्या मधून जाते हे नकाशावरून ध्यानात येईल. फसव्या रेडिओ संदेशांच्या लहरींची कंपनसंख्या खऱ्या ट्रॅबझान रेडिओलहरींच्या कंपनसंख्येहून फक्त एका किलोसायकलने वेगळी होती.

आता हे शोधक विमान ट्रॅबझानपर्यंत परतून व्हानकडे निघाले. रेडिओ मार्गदर्शकाची सूचिका व्हानची दिशा दर्शवू लागली व व्हानचे संदेशही ऐकू येऊ लागले. परंतु त्या दिशेने गेल्यास विमान सोवियत आर्मेनियात जाईल असे त्यांना दिसले. हे संदेश येरवान शहराजवळून येत होते. या बनावट संदेशांमुळेच डंकनचे विमान सोवियत आर्मेनियात गेले असले पाहिजे असा निष्कर्ष निघाला. त्याचे विमान ट्रॅबझानच्या बनावट संदेशांमुळे रशियन सरहद्दीच्या जवळ पोचले व नंतर सोवियत आर्मेनियात घुसल्यावर त्याला रशियन विमानांनी खाली पाडले असले पाहिजे !

शोधक विमान जमिनीवरील खुणा व रडारच्या सहाय्याने व्हानजवळ आल्यावर त्याला तेथील खरे संदेश ऐकू येऊ लागले. बनावट संदेशलहरींची कंपनसंख्या व खऱ्या लहरींची कंपनसंख्या यात या वेळी १५ किलोसायकल्सचा फरक पडला.

या रशियन फसवेगिरीचा सबळ पुरावा हाती आल्यामुळे अमेरिकेने रशियाला त्याबद्दल जाब विचारला. परंतु रशियन प्रतिनिधींनी साफ उडवा-उडवीची उत्तरे दिली. फसवे रेडिओसंदेश देऊन रशिया अमेरिकन विमानांना फसवून त्यांचा बळी घेतो या अमेरिकेच्या आरोपाचा त्यांनी साफ इन्कार केला !

लष्करी परिभाषेत या प्रकाराला 'चकविणे' (Spoofing) असे म्हणण्यात येते. असे करणे आंतरराष्ट्रीय कायद्याविरुद्ध आहे. १९५२ साली दळणवळण संदेश व्यवस्थेचे आंतरराष्ट्रीय नियम तयार करण्यात आले आहेत. त्यांना रशियासह सर्व राष्ट्रांची मान्यता आहे. या नियमानुसार प्रत्येक विमातळाच्या रेडिओ प्रक्षेपकाच्या लहरींची कंपनसंख्या व लांबी निश्चितपणे ठरविण्यात आली आहे. दुसऱ्या देशाच्या संदेशव्यवस्थेत अशा प्रकारे ढवळाढवळ करणे हा गुन्हा आहे.

अत्यंत कुशल वैमानिकही फसव्या रेडिओ संदेशामुळे वाईट हवामानात वाट चुकू शकतो. त्याला फसवून आपल्या प्रदेशात आणणे व त्याचे विमान पाडून त्याचा बळी घेणे हा त्याचा जाणून बुजून केलेला खूनच नव्हे काय ? □ □ □



पहाटेचे पाच तरी वाजले असावेत. एरवी आठ वाजेतो बिछान्यातच गुरफटून राहणाऱ्या अनतरावांना मनाच्या उलथापालथीने अवेळीच जागे केले होते.

पहाटेचे गार वारे सुटले होते चांदण्याच्या सौम्य प्रकाशात समोरच्या पटांगणातली डेरेदार बकुळीची, सारख्या वयाच्या आकाराची दोन झाडे, सळसळत होती. मधला झोपाळा किंचितसा हलत होता. घराच्या व्हरांड्यात उभे राहून ह्या साऱ्या वातावरणाकडे पाहता पाहता नकळतपणे अनंतरावांची पाउले झोपाळ्याकडे वळली. चालताना बारीकसा खडा पायात बोचला...एक कळ उठली...सर्वांगाला ती कळ व्यापत असल्याचा उगाचच भास झाला त्यांना. पाय मातीवर रगडून ते तसेच पुढे गेले. पारिजातकाची गळायची ही वेळ, जाता जाता चार सहा फुले त्यांनी वेचली... अपेक्षेपेक्षाही लवकर ती कोमेजत असावी असे त्यांना वाटले. एक अनामिक वेदना सर्वांगातून सळसळत गेल्यासारखी त्यांना जाणीव झाली.

...आज साऱ्या गोष्टीतच त्यांना हे नैराश्य जाणवत होते...झोपाळ्यावर पोचताच कठड्याशी रेलून त्यांनी सारे शरीर सैल सोडून दिले.

पाळणा किंचितही हलू नये असे त्यांना मनापासून वाटत होते...परंतु नियती सारे मनासारखे थोडेच घडू देते !

अनंतरावांना खूपच अस्वस्थ वाटत होते...काल मात्र समाधानाच्या सीमेपाशी त्यांना नियतीने हुलकावणी दिली होती. त्यांना गवसले होते ते अगदी अपरिचित होते, घडू नये हेच ते होते. नियतीने त्यांच्या मनासारखे घडवतानाच सारे हिसकावले होते केवढी मोठी हार होती त्यांची !

चार आकृत्या पुन्हा पुन्हा त्यांच्या दृष्टीसमोर उभ्या राहत होत्या.

निमा...

वसू...

प्रभा...

आणि सूर्यकान्त.

निमा !

त्यांची एकुलती एक मुलगी. पहिला मुलगा वारल्यानंतरचे आठ दहा वर्षांनंतरचे त्यांचे ते अपत्य. जीवापाड प्रेम त्यांचे तिच्यावर. साऱ्या समाधानाचा गाभा तीच.



सैय्यद अकबर

त्यांना आठवले...निमा अगदी लहान असताना तिने त्यांना विचारले होते—
" बाबा, मोठ्यांचं कधीच चुकत नाही काहो ?"

तिचा हा प्रश्न अनंतरावांना त्यावेळेस तिची बडबड वाटली होती...आज मात्र उत्तर दिल्याशिवाय राहून गेलेला आयुष्यातला सर्वात महत्त्वाचा हाच प्रश्न त्यांना वाटत होता.

निमाच्या सुखासाठीच ते धडपडत राहिले होते. निमाच्याच आनंदात त्यांनी आपले सुख पाहिले होते. ती प्री मध्ये फर्स्ट क्लासमध्ये आली तेव्हा त्यांचा आनंद गगनात मावेना—

—केवढी मोठी पार्टी दिली त्यांनी ! खूप लोक आले...खूप मजा झाली.

त्या दिवसाच्या आनंदाच्या भरातच निमाने त्यांना विचारले–"बाबा परवानगी द्याल तर...वसूशी लग्न करीन म्हणते."

अनंतराव चूपच झाले...आपल्यासाठी आपणच साथी निवडावा ह्या निमाच्या विचाराचे त्यांना काहीच वाटले नाही पण...वसूला निवडताना निमाने चूक केली असेच त्यांना वाटले. काय बोलावे तेच त्यांना कळेना. एकुलत्या एका मुलीची ही इच्छा ! त्यांच्यापुढे फार मोठा पेच पडला होता...

वसू त्यांच्यामते निमासाठी सर्वस्वी अयोग्य होता...त्याच्याबद्दल त्यांची एक वेगळीच धारणा बनून राहिली होती...वसू म्हणजे साऱ्या गावाचा चर्चेचा विषय ! जिथे तिथे त्याचे नाव होते...

अनंतरावांच्या मनात त्याच्याबद्दल अधिकच तेढ निर्माण व्हायला अधिकही कारणे होती....

तो अर्धशिक्षित होता. निर्धन होता....

इतका निर्धन की--

दोन वर्षापूर्वी...

अनंतराव कोर्टाच्या कामासाठी शहरात गेले होते. अचानक रस्त्यात वसू भेटला. त्याचा नमस्कार स्वीकारतानाच त्यांनी त्याच्या पायाकडे पाहिले.... नागवे पाय...भर उन्हाची वेळ. हळू हळू त्यांची नजर वर सरकत गेली....खादीचा पायजमा...शर्ट सुरकुतलेला...दाढी तीनचार दिवसाची वाढलेली....

झाले. तेव्हापासून वसूबद्दल त्यांचे एक मत बनले. वसु म्हणाला होता—"मी विनोबांबरोबर फिरतोय. आज त्यांचा मुक्काम इथेच होता म्हणून थांबलो. अचानक तुमची भेट झाली....आईबद्दल कळले...आनंद झाला."

"पायात काही नाही तुझ्या ?"

"पदयात्रेत चप्पल तुटली दादा."

"घरी काय सांगू ?"

"सांगा भेटलो होतो म्हणून. मजेत आहे म्हणावे."

परंतु अनंतरावांना ते पटणार नव्हते. पटलेही नाही. मजेत आहे म्हणे ! थोतांड सारे...पायात वाहणा वापरायची, दाढी उकरण्याची ऐपत नाही-मजेत आहे म्हणे ! निघाले परोपकारार्थ ! पायाची आग सांगणार कुणाला ?

...अनंतरावांच्या सुखी जीवनाला, सतीचे वाण भावनेच्या सामर्थ्यावरच पेलले जाते हे माहितच नव्हते...कळलेही नव्हते. म्हणूनच निमा जेव्हा वसूशी लग्नाबद्दल बोलली तेव्हा ते नाराज झाले. निमाचे अकल्याण त्यांना त्यात दिसत होते. मात्र त्यांना तिच्या इच्छेला सरळसरळ नकार देता आला नव्हता...निमाच्या इच्छे विरुद्ध आजपर्यंत त्यांनी काहीही केले नव्हते. ह्या वेळेस मात्र...ते हैराण झाले. एकुलत्या एका मुलीची चिंता त्यांना पोखरू लागली...एक पांढुरकी छाप दिवसे-

दिवस त्यांचा चेहरा व्यापू लागली. कधी नव्हे तेवढे जडपण त्यांच्या कृतीकृतीतून जाणवू लागले...

डॉक्टर शोधावे लागले...औषधे घ्यावी लागली आणि त्यातूनच परिचय वाढत गेला डॉक्टर सूर्यकान्तचा !

डॉ. सूर्यकान्त !

तिशीच्या जवळपासचा हा तरुण डॉक्टर एम्. बी. बी. एस् झाल्यानतर दवाखाना मांडून थोडयाच दिवसाने लोकप्रिय झालेला. त्याने निराश्रितांना मोफत औषध दिले होते...गरीबांना मृत्यूपासून परत आणले होते...यांना त्यांना त्याने आधार दिला होता...नको ते कापून काढले होते आणि हवे तेथे हळुवार हाताने जोडले होते.

पापपुण्याच्या त्याच्या कल्पना वेगळयाच होत्या. कुणाच्या कल्याणासाठी स्वत:च्या स्वार्थाला, परमार्थाला, पुण्याला आणि जरा धर्मालाही झळ सोसायला हरकत नाही असेच त्याचे मत होते. म्हणूनच वसूलाही तो आपल्या विचाराचा वाटला होता. वसूही अगदी याच विचाराचा होता. असल्याचे रंग...नसल्याची खंत त्याला नव्हती.

मात्र डॉक्टर असल्या विचारापायी लोकप्रिय ठरला होता—आणि वसू ठरला होता उपेक्षित !

तरीही डॉक्टर आणि वसूच्या मैत्रीचा बोलबालाच होत होता. दोघांचेही विचार एक होते...जिवलग मैत्रीत ते परिवर्तीत होत गेले. वसू डॉक्टरकडे गेला तोही योगायोगानेच !

निमा समजून चुकली होती की वसूशी आपले लग्न होणे अशक्यच आहे... वडिलांच्या आजाराकडे पाहून तिलाच तिचे मन खात होते. नाईलाजास्तव का होईना तिने आपल्या मनातून वसूबद्दलचे विचार अलग केले होते आणि इतरत्र लग्नासाठी होकार दिला होता...

हीच पराजयाची अस्मिता...वेगळया वळणाकडे वळली...स्वत:च्याही नकळतपणे ! तरुण मनाच्या नियमानुसार जीवनात कुणीतरी हवे होते...कुणालातरी स्थान द्यायचे होते. त्याची ' पूर्ती ' झाली प्रभाच्या रूपाने.

राजबिंडया स्वरूपाचा गोरागोरा भराड प्रभा तिच्या जीवनात कसा शिरला तिचे तिलाही कळले नाही.

वसूजवळ असलेले सारे त्याच्यात नसले तरीही वसूजवळ नसणारे काही वेगळेपण निश्चितच प्रभाजवळ होते. जीवनाला गांभीर्य जितके प्रिय तितकीच खेळकर प्रवृत्तीही आवडते ! वसूच्या प्रवृत्ती अकलीच गंभीर बनल्या होत्या...प्रभा अद्याप खेळकरपणातच मौज मानीत होता.

निमा कॉलेजच्या लास्ट इयरला असताना प्रभा अचानक कॉलेजमध्ये द्वितीय वर्षात दाखल झाला.

त्याच्या खेळकर स्वभावात निमा आपोआप गुरफटली गेली. सहजासहजी बोल-

ण्याला मुद्दाम भेटीगाठीचे स्वरूप आले. कॉलेजातल्या मुलाखती सिनेमागृहात पोचल्या. दिवसाच्या भेटी अंधारात घडायला लगल्या...

आणि निर्माण झाले त्यातून जीवघेणे सत्य !

कशीबशी परीक्षा आटोपली. निमा फर्स्ट क्लासमध्ये पास झाली होती...

वडिलांनी दिलेल्या पार्टीत मात्र प्रभा कुठेच गवसेना ! सुखात निमा असहाय ठरली. आनंदाच्या वर्षावातच तिला एकांत हवाहवासा वाटू लागला.

बी. ए. फर्स्टमध्ये पास झाल्याच्या आनंदाची धामधूम ओसरली. भल्या मोठ्या फोडातून टचटच करून राहिलेला सारा पू वाहून गेल्यावर येणाऱ्या हलकेपणाच्या ग्लानीसारखी तिची अवस्था झाली.

पोकळी भेडसावत राहिली...आणि तीन वर्षाच्या कालखंडानतर एकदा पुन्हा तिला आठवला वसू !

वसू !

ज्याच्या इच्छेला ती होकार देऊ शकली नव्हती तो !

कुठल्या मुखाने ती त्याच्यापुढे जाणार होती ? परंतु भटकलेल्या निमाला दुसरा मार्गही नव्हता.

वसूला तिने सारे लिहून टाकले...आणि हा नागव्या पायाने फिरणारा...अंगात सुरकुतलेले कपडे घालणारा तरुण तिच्यासमोर उभा राहिला...अनंतरावांच्या इस्त्री केलेल्या जीवनाला सुरकुत्या पडू नयेत म्हणून !...सहानुभूतीचे रेशमी धागे घेऊन !

निमाला धैर्य मिळाले. वसूबद्दल तिला विश्वास होता. वसू आपल्या माथ्यावरचा कलंक पुसून काढील याची तिला शाश्वती होती.

वसूही म्हणाला होता. " निमा, तुझ्या नकाराने मी खिन्न नाही झालो. प्रेमाची पूर्णता मीलनातच पाहणारा मी नव्हे. अनंत योजने दूर राहूनही आपल्या मनाशी... मनाशी प्रामाणिक असण्यातच प्रेमाची पूर्णता अनुभवता येते. मी तुझ्या असहाय्यतेचा फायदा घेईन असे वाटू नको देऊ. मी तुला हवे ते यश मिळवून देण्यात यशस्वी झालो तर मलाही आनंद आहे. अयशस्वी ठरलो तर... "

" तर ते पुढे पाहू ! "

वसूच्या पायावर पडावेसे वाटले निमाला. अपूर्ण इच्छा तिने प्रतिशोधात बदलताना पाहिल्या होत्या. वसूचे मात्र सर्वस्वी वेगळे. समाजाच्या सरळमार्गी जीवनावर ज्या चार दोन आडव्यातिडव्या रेघोट्या उमटलेल्या दिसतात...तेच हे वसूचे वेगळेपण ! त्याच्या अपूर्ण इच्छेतही किती परिपूर्णता ! सतारीच्या तारा तुटल्या म्हणून एकतारीवरही तेवढ्याच आनंदाने ताना आलापणारा वसू !

अभिमान वाटला तिचा तिलाच.

पण दुसऱ्याच क्षणी कोमेजलाही.

इतके सारे असूनही वसू तिला मिळणार नव्हता.

वसू निमासाठी धावला आणि त्याचा परिचय झाला डॉक्टर सूर्यकान्तशी. एका मताची माणसे...पण केवढे अंतर ? एक आभाळाहून उंच...दुसरा पाताळात दडलेला.

निमाच्या उपचारासोबत वसू सूर्यकांतचाही परिचय वाढत गेला दोघांनाही एक-मेकांजवळ वैचारिक साम्य सापडत गेले...मैत्रीचे नाते जुळत गेले...साऱ्या गावात वसू आणि सूर्यकांतचीच चर्चा.

पंधराच दिवस वसू राहिला असेल गावात. निमाचे जीवन सुरळीत मार्गाला लावून तो पुन्हा आपल्या कामावर निघून गेला होता...

डॉक्टर...वसूला विसरू शकत नव्हते.

निमाला घेऊन वसू डॉक्टरकडे आला तेव्हा म्हणाला होता – " डॉक्टर, तुम्हाला आवडणार नाही कदाचित्, मात्र मी तुमच्याकडे आलोय खरा. धाडस करून. तुमच्याबद्दल विश्वास बाळगून. तुम्ही झाकली मूठ लाखाची ठेवाल म्हणून !"

डॉक्टरांनी उलट विचारले होते – " तुमचा परिचय ?"

" परिचय नंतर होईलच डॉक्टर, प्रथम कामाचे पहा. "

ऐकून डॉक्टर वसूवर रागावले होते. त्यांनी त्याचाच तो दोष धरला होता. चांगलेच बोलले ते त्याला.

पण वसू शांत होता. सारे ऐकून हसला आणि म्हणाला – " कुणाला काही कळू नये ही माझी अपेक्षा होती. परंतु तुम्हाला आता सारे सांगायला हरकत नाही. " – आणि मग दोन तासाच्या संभाषणात त्याने स्वतःचा निमाचा संबंध ... नकार ... मग प्रभाशी आलेले संबंध आणि त्यातून उभे राहिलेले हे संकट ... सारे सारे समजावून सांगितले. शेवटी म्हणाला – " डॉक्टर, निमा ... अनतराव कधीच बदनाम होऊ नये ही माझी इच्छा. अनंतरावांबद्दल मला अनंत श्रद्धा आहे...

—त्यांना काळीमा लागू नये अशी माझी इच्छा आहे. म्हणूनच कायद्याबाहेरची ही केस मी तुम्हाला स्वीकारायला लावतो आहे. त्यात यश मिळाले तर सारेच सुदर – नाहीतर निमाचे जीवन उद्ध्वस्त होऊ नय म्हणून मी तिच्या ह्या कलंकाला डोळे भरून पाहिल्यावरही तिला स्वीकारीन ... मात्र अनंतरावांबद्दल मला काहीच करता यायचे नाही...."

...डॉक्टर जीवापाडच्या प्रयत्नांनी का होईना ह्यात यश मिळवा. निमा आणि अनंतराव ... दोघांचेही त्यात भले आहे. ह्यात पापपुण्याचे मोजमाप करायचे नसते. पापात पुण्य जन्माला घालताना पापही भाग्यवान ठरत असते...

...तुमची फी ... मी गरीब आहे...एका पायी हिंडणाऱ्या नोकरीपेक्षा माझी दुसरी श्रीमंती नाही. निमासाठी खर्च तर करायलाच हवा होता ... म्हणून मुद्दाम आईच्या अंगावरचे उरलेसुरले सारे दागिने विकून मी ही रक्कम उभारली आहे. अधिकही लागतील तर मी तुम्हाला देईन. कसेही करा, मात्र एवढे मोठेपण घ्या स्वतःकडे,

एका कुमारीकेची ओढाताण तुम्हीच थांबवू शकता. अनंतरावांना तुम्ही बदनामी ... छी —थू पासून वाचवू शकता."

असे म्हणून वसूने हातातल्या सान्या नोटा डॉक्टरपुढे सरकावल्या आणि तो गप्प झाला ... डॉक्टरांच्या मनाचा वेध घेण्यासाठी !

तो बोलत होता तोपर्यंत डॉक्टर ऐकतच होते. आता त्याचे मौन त्यांना बोच लागले. तो त्यांना आता आभाळाएवढा वाटत होता. अहिल्येला शाप देणाऱ्या गौतमाची त्यांना आठवण झाली ... वसू शापिष्ट अहिल्येला मुक्तता देवू पाहत होता ... गौतम जिकला होता वसूने !

डॉक्टरांनी पटकन पैसे परत केले ... भरल्या डोळ्यांनी त्याला कवटाळीत म्हणाले — " वसू, क्षमा कर मला. " ... स्वत:च्या पेशन्टसाठी अभिमानाने फुलणारे हे डॉक्टरी क्षण ! धन्यता वाटली डॉक्टर सूर्यकान्तला.

पंधरा दिवसात सारे सुरळीत झाले. वसूच निघून गेला डॉक्टरांच्या पूर्ण स्मरणात राहून.

पुढे सहा सात महिन्यानंतरच —

निमाचे एका उत्कृष्ट घराण्यात लग्न ठरल्याच्या आनंदात अनंतराव सुखावत होते. निमाच्या सुखासाठी धडपडण्याचा सर्वात महत्त्वाचा टप्पाही त्यांनी किती उत्कृष्टपणे गाठला होता ? लग्नाच्या दिवशी तर त्यांची धांदल विचारूच नका ... हे आले का ते आले का पासून ... हे हवे का ... ते कमी पडले का पर्यंत सान्यावर त्यांचे लक्ष !

अशाच धांदलीत त्यांचे लक्ष गप्पात रंगलेल्या वसू व डॉक्टरकडे गेले तेव्हा उपेक्षेने ते म्हणाले — " वसू आलाच वाटतं ! " वसू हसतच उत्तरला. " होय दादा, निमाचे आग्रहाचे निमंत्रण टाळता नाही आले. "

अनंतरावांनी डॉक्टरांना खूण करून आपल्या बरोबर नेले. म्हणाले — " या वसूला बोलवायची माझी इच्छाच नव्हती. निमाचा आग्रह पडला म्हणून बोलवावे लागले. ह्या मुलाच्या आणि तुमच्या दोस्तीचे खूप ऐकलंय मी ... पण तुमची प्रतिष्ठा कुठे...तो कुठे ! तुम्ही कोण ? तो कोण ? त्याच्या संगतीत तुम्हीपण डागळाल..."

" नाही अनंतराव, माणसाची पारख त्याच्या मनापासून होत असते ... ऐकवा — एकवीतून नव्हे. गरीबी हा दोष नव्हे... अमीरी हे भूषणही नव्हे...जीवनात जे आपण नेहमी हवे म्हणतो ते वसूजवळ खूप आहे..."

पण अनंतरावांना पटले नाही ... आणि वसूबद्दल त्यांनी डॉक्टरांना खूप सांगितले ... खूप टाकून बोलले ते त्याच्याबाबतीत. तेव्हां डॉक्टरांच्याने राहवले नाही ... ज्यांच्या इभ्रतीसाठी वसू स्वतः मनावर दगड ठेवू पाहत होता ... ज्यांच्यासाठी वसू डॉक्टरांकडे स्वत:चा कमीपणा घेऊन गयावया करीत होता तेच वसूबद्दल असे बोलत होते...

डॉक्टरांच्याने राहवले नाही ... आणि वसूला नालायक समजणाऱ्या ह्या अनंत-रावांना त्याचे अंतरंग कळू द्यावे म्हणून भावनेच्या भरात नको ती गोष्ट बोलून गेले ... सारी इत्थंभूत हकीकत त्यांनी अनंतरावांना सांगितली.

अनंतराव थक्कच झाले. हजारो संमिश्र भावना आपला पाठलागच करताहेत असे वाटून त्यांचे मन चौखूर उधळले — निमाचे पतन ... क्रोध ... डॉक्टरांचे कायद्याबाहेरचे कर्तव्य ... प्रभाची नीचता ... वसूची नेहमीची गूढता ... ! जीवना-तल्या साऱ्या भावनाच आज एकाकार झाल्या असाव्यात असे त्यांना वाटले.

... पण कर्तव्य पुढ्यात होते. उरावर सारे ओझे घेऊन ते पुन्हा कार्यात मग्न झाले. सारे उरकेपर्यंत ते धावत होते ... शेवटी निमाला सासरी नेणारी मोटार दृष्टीआड झाली तेव्हा त्यांच्या दृष्टीपुढे उभा राहिला ... वसू ! सुरकुतलेल्या कपड्यातला, नागव्या पायाने फिरणारा वसू अदृश्यात त्यांच्यापुढे उभा राहून सांगत होता — "दादा ... मी तुमच्या सुखासाठी धडपडलो ... तुमची इभ्रत सांभळण्यासाठी ... आणि निमाच्या उद्‌ध्वस्त होऊ पाहणाऱ्या जीवनासाठी मी गौतमाशी स्पर्धा करायला तयार झालो ...

आणि तुम्ही ... तुम्ही मला कधीच जवळ नाही केले ना ? भरल्या मंडपातही तुम्ही माझा अपमान केला दादा ?

कां दादा ... असे कां ?"

□

"नाही ऽऽऽऽ !" किंचाळत अनंतराव एकदम जागे झाले. पहाटेच्या थंड वाऱ्यात झोपाळ्यावरच त्यांना झोप लागली होती.

त्यांनी भिरभिरत्या नजरेने आजूबाजूला पाहिले ... मघाचे सारेच वातावरण बदलले होते. सौम्य चांदणे संपले होते ... गार वारे संपले होते ... पारिजातकाकडे त्यांचे लक्ष गेले. फुलांचा सडा पार कोमेजून गेला होता.

... पारिजातकाची गळायची वेळ संपली होती — सारी फुले गाळून टाकल्या-नंतर !


त्यांना वाटले ... असेच आहे. जीवनात कधी समाधानाच्या सीमेवरती असमा-धान गवसेल तर कधी असमाधानाच्या सीमेवरती समाधान !

एव्हाना दिवस वर आला होता ... त्यांना एकदम आठवले ... वसू आज पुन्हा गावाला आपल्या कामावर जाणार होता. अनंतरावांची पाउले नकळतपणे वसूच्या घराकडे वळली ...

समाधान असमाधानाच्या सीमा टाळण्यासाठी त्यांनी नियतीचे आव्हान स्वीका-रले होते.


□ □ □

# कॅमल शाई चांगलीच!
# कोणतीही घ्या




## कॅमल 'स्पेशल' शाई

माफक किमतीची, झरझर वाहणारी ही शाई नेहमीच्या वापरासाठी सर्वोत्तम. लवकर वाळते, पेनमध्ये कचरा साठूं देत नाही. कॅमल 'स्पेशल' शाईमुळे लिहितांना पेन कधीही झटकावे लागत नाही. असा दर्जा व एवढी माफक किंमत —हेच कॅमल स्पेशल शाईचे वैशिष्ठ्य.




## कॅमल 'डीलक्स' शाई

ही आमची नवीन शाई. तुमचे पेन किंमती असेल तर त्याकरिता या शाईसारखी दुसरी शाई नाही. झरझर वाहते, लवकर वाळते, लिहिता लिहिताच तुमचे पेन साफ करते. पेनमध्ये कचरा साठू देत नाही. तुमच्या पेनचें संपूर्ण संरक्षण करते. कॅमल 'डीलक्स' शाई टेबलावर अभिमानाने ठेवा. असा शाईचा दर्जा— तसाच तिचा नूर आहे.

vision

सौ. पुष्पा भावे

'सर्वोत्कृष्ट मराठी कथा : खंड १' हा १८५४ ते १९२४ या कालखंडातील निवडक कथांचा संग्रह आहे. यामुळेच आज समीक्षण करायचे ते त्या कथांचे नाही तर या वेगळ्या आणि स्वागतार्ह अशा संपादनाचे. अशा प्रकारच्या प्रयत्नांचे महत्त्व वरवर पाहता ध्यानात येणार नाही. परंतु ऐतिहासिक दृष्टीने आणि अभ्यासकांच्या दृष्टीनेही, दरवर्षी निघणाऱ्या अनेक कथासंग्रहांपेक्षा या संग्रहाचे स्वरूप व महत्त्व वेगळे आहे, हे प्रथमच लक्षात घेतले पाहिजे.

१८५४ ते १९२४ हा आधुनिक मराठी साहित्यप्रकारांच्या जडणघडणीचा कालखंड

## सर्वोत्कृष्ट मराठी कथा : खंड १

**संपादक : राम कोलारकर**

असल्यामुळे अभ्यासकाला महत्त्वाचा वाटणारा आहे. परंतु या काळातील नियतकालिके आणि पुस्तके दोन्ही आज फार दुर्मिळ झालेली असल्यामुळे अभ्यासकाला केवळ वाङ्मयेतिहासातील विशेषणयुक्त जंत्रीवर आपले समाधान करून घ्यावे लागते. शिवाय वाङ्मयेतिहासामध्ये, स्थलमर्यादेमुळे, प्रामुख्याने यशस्वी साहित्यकृतींचाच उल्लेख होतो. परंतु त्या त्या काळातील साहित्यपट (literary scene) पूर्ण होण्याच्या दृष्टीने अपयशस्वी साहित्यकृतींनाही महत्त्व असते. आणि म्हणून ग्रंथनिविष्ट साहित्यकृतींपेक्षा काही वेळा नियतकालिकातील लिखाण अधिक प्रातिनिधिक असते. प्रस्तुत कालखंडातील नियतकालिकांतून

निवडलेल्या कथांचा संग्रह ही मराठी वाचक–अभ्यासकांची फार दिवसांची गरज होती. ती श्री. राम कोलारकर यांच्या या संग्रहाने पुरी केली आहे.

'एक अधुरी कहाणी' या काव्यात्मक नावाने संपादकाने या कथासंकलना-मागील भूमिका स्पष्ट केली आहे. त्याचप्रमाणे प्रस्तावनेत, भारतातील मुद्रण-कलेच्या प्रारंभापासून मराठी कथेच्या विकासकालापर्यंतचा एक आराखडा देण्याचा यत्न केला आहे. 'एक अधुरी कहाणी' हे निवेदन ललितनिबंधाच्या शैलीमध्ये –बऱ्याच स्थळी पूर्णविरामाऐवजी टिंबे वापरून – केले आहे. अशा संकलनाच्या संपादकाच्या निवेदनाला ही भावविवश शैली अननुरूप आहे हे स्पष्टपणे जाणवते. प्रस्तावनेतदेखील शैलीच्या तुटकपणामुळे मराठी कथात्मक वाङ्मयाच्या इतिहासाचे यथासांग चित्र वाचकांपुढे उभे राहात नाही. या प्रस्तावनेत, 'कथा' या वाङ्मय-प्रकाराची चर्चा करून आपल्याला मान्य असलेले उत्कृष्ट कथेचे निकष श्री. कोलारकर यांनी वाचकांना सांगितले असते तर त्यांनी योजलेली 'सर्वोत्कृष्ट मराठी कथा' ही शब्दसंहती अधिक अर्थपूर्ण ठरली असती.

## प्रातिनिधिक चित्र नाही

या संग्रहातील चौतीस कथांकडे नजर टाकली असता, श्री. कोलारकर यांनी शोधकपणे, साक्षेपीपणाने अनेक नियतकालिकांतून या कथा निवडलेल्या आहेत याची साक्ष पटते. परंतु या चौतीस कथा वाचल्यानतर १८५४ ते १९२४ या कालखंडातील मराठी कथेचे जे चित्र पुढे उभे राहते ते प्रातिनिधिक मात्र नाही. कारण कथांची निवड करताना संपादकाने परंपरेपेक्षा 'departure'वर (निराळे-पणावर) भर दिलेला आहे. पण मला वाटते, या निराळ्या कथा इतर ठरीव ठशांच्या कथांच्या जोडीने छापल्या असत्या तर या संग्रहात श्री. भटकळांना अपेक्षित असलेले "मराठी कथेच्या अमूलाग्र परंपरेचे अस्तित्व, सातत्य व स्वारस्य यांचे प्रतिबिंब" अधिक स्पष्टपणे दृग्गोचर होण्यास मदत झाली असती. तसेच त्या काळातील मराठी नियतकालिकातील कथांना काहीसा त्या त्या नियत-कालिकाच्या प्रकृतीचा स्वभाव होता, याचाही विचार प्रस्तुत संकलन करताना व्हायला हवा होता.

नव्या युगाच्या परिणामांनी बदलणाऱ्या, (कुटुंबजीवनाचे अनुभव व्यक्त करणाऱ्या सामाजिक कथा घटनाप्रधान व भावविवश म्हणून संपादकांनी टाळल्या आहेत. पण मला वाटते, 'मेकॅनो' (श्री. गो. ग. लिमये – १९२३) इतकेच या कथांतील मानवी स्वभावाच्या चित्रणाचे परिणाम आजच्या कथेवर झालेले आहेत. मराठी कथेमध्ये 'संसारकथां'ची परंपरा अखंडितपणे चालूच आहे. यामुळे 'मनोरंजना'-तील कथांमधून विविध पद्धतीच्या कथांची निवड योग्य झाली असती. संपादक या नात्याने प्रातिनिधिक संग्रहासाठी साहित्यकृतींची निवड करताना वैयक्तिक आवडी-निवडीच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न आवश्यकच नसतो काय? कथांच्या निवडी-

बद्दल ज्या वाचकांचे-अभ्यासकांचे मतभेद होतील त्यांनाही एक गोष्ट निश्चित जाणवेल की या संकलनामागे अपार परिश्रम आहेत. अशा परिश्रमांचे चीज मराठीमध्ये सहसा होत नाही. खरे पाहू जाता, रसिकाच्या उत्साहाच्या पलीकडे जाऊन श्री. कोलारकर यांनी अनेक नियतकालिके शोधून कथा निवडण्याचे, कथांची व नियतकालिकांची सूचि करण्याचे जे परिश्रम केले त्याबद्दल मराठी वाचकांनी व विशेषत: अभ्यासकांनी त्यांचे ऋणी राहायला हवे (मात्र या सूचीत राहिलेल्या काही त्रुटींची नोंद घ्यायला हवी. पुणे नगरपालिका ग्रंथालय व मंडलिक ग्रंथालय यात दिग्दर्शन [ ऑगस्ट १८४०; पु० १ – अंक ६ ] व सुमित्र [ १८८५ ] या नियतकालिकांचे काही अंक आहेत. तीच गोष्ट 'चंद्रिका' या नियत-कालिकाची.) 'विविधज्ञानविस्तार'पूर्व काळातील 'चंद्रिका' या नियतकालिकाचा उल्लेख संपादकांनी सूचीत का केला नाही ते कळत नाही. १८५४ ते १९२४ या कालखंडातील प्रारंभीचे कथा छापणारे मासिक म्हणून 'चंद्रिका' महत्त्वाचे होते. आणि या मासिकाचे सहा अंक मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या मध्यवर्ती शाखेत उपलब्ध आहेत. कथेचा आकार मराठीत कसा घडत गेला याचा विचार करताना आपटेपूर्व काळातील नियतकालिकातील अशा दोन चार कथा या संग्रहात असत्या तर वाचनीयतेच्या दृष्टिकोनातून नव्हे तर चित्र अधिक रेखीव होण्यासाठी मदत झाली असती.

परंतु अशा प्रकारचे संग्रह कितीही निघाले, कितीही वेगवेगळे छेद घेऊन त्यांच्या योजना आखल्या तरी ते अभ्यासकाला अपुरेच वाटतात, यातच अशा संग्रहांची आवश्यकता अधोरेखित होते. श्री. कोलारकरांच्या संकलनापासून स्फूर्ती घेऊन तरुण अभ्यासकांकडून असे अनेक संग्रह निघावेत ही अपेक्षा. श्री. कोलारकरांच्या उपक्रमाबद्दल आस्था बाळगणारे सारेच वाचक त्यांच्या पुढील संकलनाची वाट पाहतील यात शंका नाही. □ □

**[ सर्वोत्कृष्ट मराठी कथा : खंड १ : १८५४–१९२४**
**संपादक : राम कोलारकर; पॉप्युलर प्रकाशन**
**३५ सी ताडदेव रोड, मुंबई ३४ डब्ल्यूबी; १९६८**
**किंमत : दहा रुपये ]**



लेखक .................. ब्रिगेडिअर जे. पी. दळवी

अनुवाद .................. ॲडव्होकेट माधव कानिटकर

लेखांक .................. पंचवीसावा

२० ऑक्टोबर १९६२ ! पहाटे ५ वाजल्यापासून तुफानी हल्ले करीत असलेल्या चिन्यांचे लक्ष आता सांगधरकडे वळले होते. सकाळचे ९ वाजले होते. तात्पुरता पूल आणि पूल क्रमांक ५ या ठिकाणांमधून भारतीय सेनेला उखडून काढल्यानंतर बरोबर ९ वाजता चिन्यांनी सांगधरवर पहिला हल्ला चढवला.

२० ऑक्टोबरच्या सकाळीच आपले एक विमान नेहमीप्रमाणे रसद टाकण्यासाठी आघाडीवर आले होते; पण चिन्यांच्या विमान-विरोधी तोफांनी भारताचे हे विमान त्वरित खाली पाडले. लढाई जवळ आलेली आहे—नव्हे प्रत्यक्षात सुरू झालेली आहे—हे एअर फोर्सला कळवण्याची तसदीच कुणी घेतली नव्हती. एअर फोर्स आणि आर्मी यांच्यात जे परस्पर सहकार्य आणि अंतर्गत एकात्मकता लढाईमध्ये आवश्यक असते ती देखील आपल्याकडे नव्हती.

तेवढ्यात सांगधरला आणखी एक बेसावध हेलीकॉप्टर आले. त्यात होते मेजर रामसिंग, सेकंड इन् कमांड, डिव्हीजनल सिग्नल्स रेजिमेंट आणि ह्या हेलीकॉप्टरचे पायलट होते फ्लाईट लेफ्टनंट सेहगल. हे हेलीकॉप्टर नुसते दिसले मात्र चिन्यांनी

ते तात्काळ खाली पाडले. मेजर रामसिंग आणि फ्लाईट लेफ्टनंग सेहगल दोघेही ठार झाले. मेजर रामसिंगचा मृत्यु अनपेक्षित असेल पण तरी देखील तो धीरोदात्त घडला. तुम्हाला आठवत असेल; मागे मी असे म्हटले होते की जनरल प्रसाद मला असे म्हणाले होते की 'तुला भेटण्यासाठी मी स्वतःच आघाडीवर येतो,' जे तुझ्या ब्रिगेडच्या नशिबी येईल तेच माझ्याही येईल.' या हेलिकॉप्टरने खरे म्हणजे जनरल प्रसाद येणार होते,...पण तितक्यात आपल्या डिव्हीजनल हेडक्वार्टरला चिन्यांच्या तुफानी हल्ल्याची बातमी कळली. जनरल प्रसाद ह्याच हेलीकॉप्टरने आघाडीवर यायला निघाले होते. त्यांना मेजर रामसिंगने अडवले. तो जनरल प्रसादना म्हणाला, "साहेब, तुम्ही आधी जाऊ नका! मी आधी जातो आणि आघाडीवरच्या परिस्थितीत थोडी तरी सुरक्षितता आहे की नाही ती पाहातो" जनरल प्रसाद त्यावर त्याला म्हणाले "तसे कसे चालेल? ब्रिगेडियर दळवीला शब्द दिलाय...आणि तो मला पाळलाच पाहिजे." तरीदेखील मेजर रामसिंगने हट्टाने जनरल प्रसादना थोपवून धरले आणि तो या दुर्दैवी हेलीकॉप्टरने आघाडीवर आला आणि ठार ाला. मेजर रामसिंग आणि फ्लाईट लेफ्टनंट सेहगल या दोन तरुणांनी स्वतःचे जीव गमावून जनरल प्रसादांचा प्राण वाचवला. त्यांच्या या वीर मरणाचा परिणाम असा झाला की मेजर रामसिंगसारखा सेकंड इन कमांड गेला. डिव्हीजनल सिग्नल रेजिमेंट पोरकी झाली. कारण या रेजिमेंटचा कमांडिग ऑफीसर चिन्यानी अगोदरच पकडून नेला होता.

'चिनी सेनेसमोर भारतीय जवान पळत सुटले!' असली बाष्कळ बडबड करणाऱ्या लोकांच्या जिभा छाटल्या पाहिजेत. जवानांची काही चूक नाही! जितके म्हणून शौर्य दाखवावे लागते तेवढे त्यांनी दाखवून दिले. जवान फक्त शूर असून उपयोग काय? त्यांच्या हातात शस्त्रे नाहीत, दारूगोळा नाही. नालायक लोकनियुक्त प्रतिनिधींची वर्षानुवर्षांची दिरंगाई आणि निष्काळजीपणा जवानांना नडला. भारताच्या इतिहासात पुन्हा एकदा हे लिहीले गेले की अधिक चांगली शस्त्रास्त्रे घेऊन, उत्तम लष्करी तयारी करून आलेल्या शत्रूपुढे, मूळचा शेतकरी असलेला पण देशासाठी भारतीय लष्करात शिरलेला हा जवान बळी दिला जातो.

सकाळी ८ वाजताच गुरखा जवानांची तयारी चांगली व्हावी या हेतूने मी सांगधरला जायचे ठरवले. रजपूत जवानांचे भेसूर भवितव्य आता जवळजवळ ठरल्यासारखेच होत. चिन्यानी त्याना कुठूनही जिवंत परत जायला रस्ताच ठेवला नव्हता. त्याना ठार मारायचे का पकडून न्यायचे ते आता चिन्यांनी ठरवायचे होते. चिन्यानी नाम-का-चूमध्ये जोर करून जर का तो प्रदेश सोडून देणे भाग पाडले तर मी सांगधरला जाईन असे जनरल प्रसादना मी अगोदरच सांगून ठेवले होते आणि त्यानी त्याला अनुमतीही दिली होती. दुसरे म्हणजे ती वेळच अशी होती की, जनरल प्रसादांची अनुमती म्हणजे एक फार्सच राहिला होता. राजकीय आवश्यकता

किंवा खवळलेली भारतीय जनता चिन्यांचे जोरदार हल्ले आता थांबवू शकणार नव्हती.

माझे ब्रिगेड मेजर, मेजर खरबंडा यांना मी नाईलाजाने हुकूम दिला की "सांगधरकडे चला !" मेजर खरबडा त्यावर मला म्हणाले "साहेब ! जरा १५-२० मिनीटे थांबा. आपले गुप्त कागदपत्र जाळून टाकतो." मेजर खरबंडानी त्यानंतर आपले ते कागद जाळून टाकले आणि आमची तुकडी सांगधरकडे निघाली. वाटेत मेजर खरबंडा आणि मेजर परेश शांत आणि गभीर होते. आमची तुकडी नेहमीप्रमाणे शिस्तीत हलत होती. हे फक्त मीच सांगत नाही. एका अधिकृत अहवालात जनरल प्रसाद म्हणतात, '७ व्या पायदळ तुकडीवर चिन्यांनी झुंडाने आणि प्रचंड ताकदीने हल्ला चढवला, त्यावेळी नाम-का-चूमध्ये ब्रिगेडियर दळवी त्यांच्या रोंगला (Rongla) येथील ब्रिगेड हेड-क्वार्टर मध्य होते. जास्तीत जास्त कौशल्य दाखवून ते जवानांचे नेतृत्व करीत होते. त्यांना जेवढे म्हणून करता येणे शक्य होते तितके त्यांनी केले. अखेर जेव्हा का चिन्यानी आपल्या आघाडीचा धुव्वा उडवला आणि ब्रिगेड हेडक्वार्टरच्याच डाव्या अंगाने आणि मागून लढाई चालू केली तेव्हा लढाईला वेगळे वळण लागले. ब्रिगेडियर दळवींनी सांगधरपर्यंत मागे येण्याची परवानगी माझ्याजवळ मागितली. मी स्वत: त्यांना मागे येण्याचा हुकूम दिला तेव्हाच दळवी मागे आले. पण ब्रिगेडियर दळवी आणि त्यांचे जवान सांगधरला पोचण्यापूर्वीच चिनी अगोदर सांगधरला पोचलेले होते.'

नाम-का-चूच्या परिसरात आणि थाग-ला प्रदेशात चिन्यांशी आमने-सामने झालेल्या लढाईचा शेवट हा असा झाला. पंडित नेहरूंनी उच्चरवाने 'चिन्यांना हुसकून द्या !' या दिलेल्या हुकमापासून सुरू झालेल्या नाटकाचा शेवट शोकपर्यवसायी झाला. संख्येने आणि ताकदीने कमी असलेल्या भारतीय सैन्याची चिन्यांनी दाणादाण उडवली. सुरुवातीला आपण त्याना इंचभर देखील जमीन द्यायला तयार नव्हतो, आणि प्रत्यक्षात आपण चिन्यांना हजारो चौरस मैल जमीन देऊन टाकली. इतक्या वर्षांच्या राज्यकर्त्यांच्या भोळेपणाचे आणि बेपर्वाईचे प्रायश्चित्त मिळाले. ७ व्या पायदळ तुकडीतल्या जवानांना अक्षरश: हजारो जखमा झाल्या. त्यांचे रक्त वाहून गेले आणि सातवी पायदळ तुकडी मेली. जखमी भारतमातेचे रक्त मात्र अजून हजारो वर्षे गळत राहणार आहे. तिचा झालेला अपमान आणि तिला झालेली जखम कशी आणि केव्हा भरून येणार ?

ज्यांना युद्धशास्त्रात फारशी अक्कल नाही अशा काही लोकानी चिन्यांची 'ते ईश्वराचे अवतारच आहेत ! चिनी आपल्यापेक्षा जास्त बुद्धिमान आहेत !' या थाटाची स्तुती केलेली आहे. त्यात काही तथ्य नाही.

चिन्यांच्या डावपेचांची मी अनेक भारतीय लष्करी अधिकाऱ्यांशी चर्चा केलेली आहे. आमचा सर्वांचा एकमताने असाच निष्कर्ष निघाला की या लढाईत चिन्यानी बुद्धिमत्ता

वापरलेलीच नाही. युद्ध-शास्त्रात रूढ झालेल्या नेहमीच्या पद्धतीनेच ते लढले. चिन्यानी केलेला गोळीबार आणि हालचाली आपणही करू शकलो असतो. एकट्या दुकट्या चाललेल्या निःशस्त्र माणसाला २०-२५ जणांनी जाऊन लाठ्या-काठ्यांनी बडवायचा, यात कसली बुद्धिमत्ता? जुनी बंदुक घेऊन लढणाऱ्या एकेका भारतीय जवानाला लोळवायला २० चिनी सैनिक अद्ययावत शस्त्र घेऊन आले. तशातच आपण कोंडले जाऊ ही धास्ती चिन्याना नव्हतीच. इतके सांगून झाल्यावर देखील तत्परतेने आणि आग्रहाने सांगतो की आपण धसका घ्यावा किंवा चकित व्हावे अशी एकही हालचाल चिन्यानी केलेली नाही. ते सरळ पुढे आले आणि ठोकत सुटले. ते संख्येने आणि ताकदीने जास्त होते इतकेच. एरव्ही भारतीय जवानाच्या मानाने चिनी सैनिकात विशेष असे काहीही नाही. 'चिन्यांकडे छोट्या बंदुकांचा तुटवडा होता आणि म्हणूनच समुद्राच्या प्रचंड लाटांसारखे मागून पुढे येणारे चिनी सैनिक त्यांच्या मेलेल्या कॉम्रेडच्या हातातली बंदुक काढुन घेऊन लढत होते.' ही कपोलकल्पित कथा जेव्हा मी वाचली तेव्हा माझी चांगलीच करमणूक झाली. चिन्यांचे भपकेबाज प्रदर्शन असे होते की नाम-का-चू नदीवर धरण बांधायचे काम चाललय असे भासावे इतका प्रचड तोफखाना त्यांनी अगोदरच आणून ठेवला होता. शिवाय त्यांच्या गुप्त हालचाली चालू होत्याच. अचूक गोळीबार होऊ शकेल अशा शस्त्रांचा चिन्यांना मागून सतत पुरवठा होत होता. चिनी लष्करात आपल्यासारखी तणातणी नव्हती. त्यांचा कल एकमेकाना संभाळून घेण्याचा होता. त्याचे चांगले फळ त्याना मिळाले.

भारत-चीन युद्धात चिनी लढले ते प्रचंड तोफखाना आणायचा आणि बेछूट पण अचूक गोळीबार सुरू करायचा या विख्यात रशियन पद्धतीने.

थाग-ला प्रदेशात जवळजवळ एकतर्फी झालेल्या या लढाईपासून दूरगामी परिणाम घडवून आणणारे भरमसाट निष्कर्ष काढणे चुकीचे ठरेल. माझ्या म्हणण्याचा थोडक्यात अर्थ असा की आत्ता देखील तिबेटमध्ये असलेले चिन्यांचे सैन्य इतके सुसज्ज आणि तयार आहे की अर्ध्या रात्री उठवून जरी त्याना हुकूम मिळाला तरी ते भारतावर यशस्वी हल्ला करू शकतील.

चिन्यांच्या या देदीप्यमान यशाचे खरे श्रेय त्यांच्या हायकमांडला आहे. थाग-ला प्रदेशात त्यांनी जो लष्करी व्यूहरचना केली-जे डावपेच वापरले-त्यात कपट-निती आणि लवाडीच जास्त होती. भारतात धार्मिक दंगली सुरू झाल्यानतर दोन्ही जमातीत जे धर्मवेड दिसून येते तो आवेश, तो जोश, तो उन्मत्त व पिसाटपणा त्या वेळी प्रत्येक चिनी सैनिकात होता. चिन्यांच्या यशाचे सार ह्याच्यातच आहे.

एवढच नव्हे तर लढाईत भारतावर मात करून झाल्यानंतर चिन्यानी असा भंपकपणा चालू केला की "चीनला युद्ध नकोच होते. भारतानेच चीनवर आक्रमण केले." आणि हा प्रकार म्हणजे आपल्या जखमेवर मीठ चोळण्याचाच प्रकार आहे.

तशातच छाती दडपून जाईल अशी विसंगत आणि मूर्खपणाची विधाने या लढाई-नंतर आपल्याच देशात आपलेच कांही लोक करीत सुटले. चिन्यानी त्याचाही फायदा उठवला. चीन जगाला सांगत सुटला की "२० ऑक्टोबरला सकाळी ७ वाजता ( पेकिंग वेळेप्रमाणे ) भारताच्या आक्रमक फौजांनी प्रचंड दारूगोळ्याच्या बदोबस्तांत चीनी सरहद्दीच्या पहारेकऱ्यांवर काचिलेंग नदी (म्हणजे आपली नाम-का-चू नदी ! ) आणि किझमाने प्रदेशात क्रूर हल्ले चढवले !" गरीब बिचारे चिनी पहारेकरी ? त्यानी अवघ्या दोन पॅरागन्सनिशी, की ज्या फक्त ४०० फैरी झाडू शकल्या असत्या, भारताच्या हल्ल्याला तोंड दिले !

खरे सत्य काय होते ते नंतर बाहेर पडलेच. पत्रकारांशी बोलताना एक आपलाच लष्करी अधिकारी म्हणतो "भारताच्या मोहीमेत संरक्षणापेक्षा राजकारणच जास्त होते. नाम – का – चू नदीच्या परिसरात भारताचे सैन्य विखुरलेले होते, त्यामुळेच भारतीय जवानांची चिनी भीषण कत्तल करू शकले. नाही आपल्या जवानाना पाठीमागून मदत आणि त्यांची जागाच अशी 'संरक्षण' करता येणेच शक्य नाही. खेदाची गोष्ट ही आहे. आपल्याच लोकांनी केलेल्या काही अयोग्य आणि मूर्ख-पणाच्या विधानांचा फायदा घेऊन चिनी असा कांगावा करताहेत की भारतानेच चीनवर आक्रमण केले.

मी हे सर्व एवढ्याचसाठी लिहिले की सत्य काय आहे, भारतीय जवान कसे शूर आहेत ते भारतीय जनतेला कळावे. या देशात अशा काही गुन्हेगार व्यक्ती आहेत की चिनी आक्रमणामुळे खरोखरच दुःखी झालेल्या आणि रागावलेल्या भारतीय जनतेचा क्रोध भारतीय सैन्याच्या तथाकथित नालायकपणावर ढकलताना त्याना जरासुद्धा लाज वाटत नाही. तसे करण्यात भारतीय जवानाच्या शौर्याची आणि पराक्रमाची प्रतिमा पुसून टाकण्याचा प्रयत्न करण्याचा नीच हेतू त्यामागे असतोच.

याच जनतेमध्ये एक जात अशी आहे की त्यांना देशाची काळजीच नसते. त्याना काळजी असते फक्त स्वतःची. त्यांच्या चोरट्या धंद्यांची. दिल्ली आणि मुंबईमध्ये तुम्हाला अशा अनेक रिकामटेकड्या उनाड मैना पाहायला मिळतील की ज्यांच्या नवऱ्याना चार आकडी लठ्ठ पगार आहेत. आयुष्याचा कार्यक्रम काय ? तर रात्री उंची हॉटेलमध्ये पार्टीला जायचे. दारू प्यायची. त्यांच्या पतिराजाना कसली काळजी असते ? त्याना काळजी असते की चोरट्या मार्गाने येणारा माल आपल्या हाती कसा लागेल ? खात्रीची उंची दारू कोण आणून देईल ? मुंबईतल्या अशाच एका उची हॉटेलला एकदा मी भेट दिली. मी हॉटेलात गेलो आणि मला मनःस्ताप झाला. कारण तिथे अशाच एका श्रीमंत नवऱ्याच्या नखरेल बायकोशी माझी ओळख करून देण्यात आली, 'हे ब्रिगेडियर जे. पी. दळवी.' त्यावर ती बाई मला विचारते "हॅल्लो ऽऽऽऽ! ब्रिगडियर ! प्रथम हे सांगा की चिन्यांशी लढताना तुम्हा लष्करी पोरांना झालं होतं तरी काय ?"

असल्या महामूर्ख आणि अज्ञानी लोकांनी लष्कराबाबतीत अशी टीका केली तर एकवेळ ती मी सहन करू शकतो; पण भारत-चीन युद्धाच्या भीषण नाटकाचे प्रमुख सूत्रधार कमांडर जनरल कौल यांची भारतीय लष्करालाच दोष देणारी टीका मात्र मी सहन करू शकत नाही. २० ऑक्टोबर १९६२ च्या सकाळचे पावित्र्यदेखील जनरल कौलनी राखले नाही. उलट २० ऑक्टोबरला सकाळी सुरू झालेल्या आणि थोड्याच वेळात संपलेल्या या लढाईचे वर्णन करताना, ज्या भारतीय लष्करी अधिकाऱ्यांनी आणि जवानांनी त्यांच्याशी एकनिष्ठ राहून प्रामाणिकपणे आज्ञापालन केले त्यांनाच दोष लावून जनरल कौलनी त्यांच्याच पाठीत खंजीर खुपसला. ज्यावेळी चिनी भारतीय जवानांचा शिरच्छेद करीत होते त्यावेळी जनरल कौलनी असे उद्गार काढले की, "ही लढाई प्रत्यक्ष डोळ्यांनी बघणाऱ्या एका व्यक्तीकडून मला असे कळते की आपल्या ब्रिगेड हेड-क्वार्टरने परिणामकारीत्या तयारीच केली नव्हती. खंदकसुद्धा फारच थोड खणले होते आणि बचावाचा म्हणता येण्यासारखा पवित्रा घेतलाच नव्हता."




वस्तुतः पहाटे ५ पासून तो सकाळी ८॥ पर्यंत चिन्यांनी मोठमोठ्या तोफांनी असा जबरदस्त आणि प्राणघातक हल्ला चढवला होता की त्या भयंकर गोळाफेकीचा नुसता कडकडाट ऐकला असतात तरी तुमची खात्री पटली असती की या तुफानी गोळीबारापुढे भारतीय सेना फार काळ टिकाव धरणे शक्यच नाही. ब्रिगेड हेड-क्वार्टरने जर का फारसे खदक खणले नसते तर या पहिल्याच तडाख्यात आपली संख्या होती त्याच्या १/१० झाली असती.

जनरल कौल यांचा या गैरवाजवी, अन्याय्यकारक, अयोग्य आणि भरमसाट आरोप करण्यामागे हेतू तरी काय आहे याचा अंदाज लावणे कठीण आहे. कसा-

डर या नात्याने स्वतःच्याच हुकुमामुळे ज्यांनी ७ व्या पायदळ तुकडीला दैन्यावस्थेला पोचवले त्या जनरल कौलने असले आरोप स्वतःच्याच हाताखालच्या लोकांवर करणे केव्हाही चकच. एक 'आऊट स्टँडिंग' जनरल या नात्याने जनरल कौलना साधी गोष्ट कळायला पाहिजे की ब्रिगेड हेडक्वार्टरने कितीही उत्तम खंदक खणले असते तरीदेखील चिन्यांनी आपल्याला मृत्युदंडाची भयकर शिक्षा दिली असती. आपला नाश ठरलेलाच होता. अवघी १००० माणसे २०,००० चिन्यांना कशी काय हुसकून देणार होती ?

आपल्या पुस्तकात जनरल कौलनी मूळ रोगाचे निदान न करता फक्त आत्म-समर्थन केलेले आहे. जनरल या नात्याने त्यांच्यात काय कमी होते हे सांगायला ते तयार नाहीत, इतरांच्यावर चिखलफेक मात्र केलेली आहे. नेफामध्ये त्यांनी एक निरर्थक कामगिरी स्वीकारली मात्र ती स्वीकारल्यानंतर त्या मोहीमेत स्वतःची किंमत वाढवून घेण्याएवजी किंवा ते निर्दोष ठरतील अशी खात्री पटवून देण्याएवजी त्यांनी फक्त इतरांना दोष दिलेला आहे. आपला निश्चित पराभव होईल ही खात्री असून त्यानी चिन्याना हूसकून देण्याची कामगिरी स्वीकारली. कारण आपल्या तयारीत अनेक उणीवा आहेत हे माहिती असूनदेखील त्यांना कुणाशीच भांडायचे नव्हते. भारतीय सैन्याने चिन्यांकडून सज्जड मार खाऊन माघार घेतल्यानंतर ते इतरांशी भांडत सुटले त्यापेक्षा लढाईपूर्वीच कुणाशीतरी भांडले असते तर मला अधिक आनंद होता. कुठलाही जनरल असे कधी म्हणू शकत नाही की, "या लढा-ईत आपला पराभव झाला असला तरी त्याची जबाबदारी माझ्यावर नाही. मला शिक्षा करू नका. मी माझे असे समर्थन करतो की मी हरणार आहे याचा मला बरोबर अंदाज असूनदेखील मी ती कामगिरी स्वीकारली; कारण वरून चुकीचा हुकूम आला ! आणि म्हणूनच अखेर आपला पराभव झाला."

लढाईची कामगिरी स्वीकारणाऱ्या कमांडरपुढे फक्त दोनच मार्ग मोकळे असतात. एक तर असे तरी म्हण की "या पराभवाला सर्वस्वी मीच जबाबदार आहे !" किंवा वरून आलेला चुकीचा हुकूम आपले डाके वापरून ठोकरून देऊन ठणकावून सांगायचे की "हा हुकूम चुकीचा आहे; मी तो पाळणार नाही-मग मला काय द्यायची शिक्षा ती द्या !"

देऊ उदाहरणे ? जून-जुलै १९४२ मध्ये ब्रिटीशांचा पराभव झाला. या परा-भवाची संपूर्ण जबाबदारी फिल्डमार्शल अचिनलेकने स्वतःवर घतली. सर विन्स्टन चर्चिलना दिलगिरी व्यक्त करणाऱ्या लिहीलेल्या पत्रात तो म्हणतो "गेल्या काही महिन्यात आपल्याला जी माघार घ्यावी लागली, आपला जो पराभव झाला त्या-बद्दल मला तीव्र दुःख होत आहे. या पराभवाची जबाबदारी पूर्णपणे माझ्यावर आहे हेही मला मंजूर आहे." याउलट Zorndorf च्या लढाईत जनरल Seydlitz ला वरून चुकीचा हुकूम दिला गेला त्यावर जनरल Seydlitz म्हणाला "लढाई

संपल्यानंतर वाटल्यास राजाने माझे डोके उडवावे, पण लढाई चालू असताना कृपा-करून मला ते वापरून द्या."

[After the battle the king may dispose of my head as he wills; but during the battle he will kindly allow me to make use of it.]

जनरल कौलना स्वतःचे डोकेही वापरायचे नव्हते आणि मग गिळून स्वस्थ बसून स्वीकारलेल्या चुकीच्या हुकुमांची जबाबदारीदेखील स्वतःवर घ्यायला ते तयार नाहीत; आणि म्हणूनच उपलब्ध साधनानिशी त्यांच्या हुकुमाचे पालन करून परा-क्रमाची जेवढी म्हणून शर्थ करता येईल तेवढी करून दाखविणाऱ्या आघाडीवरच्या आपल्या तुकड्यांनाच त्यांनी दोष लावणे हे त्यांना शोभत नाही.

ज्या मोहिमेचा पाया सुरुवातीपासूनच कधी लष्करी नव्हता ती मोहीम लष्करी होती अशा अर्थाची वारपांगी विधाने करूनदेखील जनरल कौलना त्यांचे समर्थन करता आलेले नाही. उलट तसे करून त्यांनी जे लष्करी अधिकारी अपघाताने या चिनी तडाख्यात सापडले आणि जे कुठलाही हुकूम स्वतः देऊ शकत नव्हते अशा निष्पाप अधिकाऱ्यांना उगाचच या वादात खेचले; शिवाय भारतीय सेनेचे प्राविण्य आणि किर्ती धुळीला मिळविण्याची संधी काही विघ्नसंतोषी लोकांना दिली.

अंतःकरणापासून सांगतो की जनरल कौल यांचा मला मत्सर वाटत नाही. त्यांच्याबद्दल माझ्या मनात कुठलाही आकस नाही. जनरल कौलसारख्या एका प्रभावी व्यक्तिमत्वाच्या अत्यंत बुद्धिमान् माणसाचा असा क्रूर अधःपात व्हावा हे पाहून खरोखरच वाईट वाटते. मोठमोठे सन्मान त्यांच्या नशिबात होते. त्यांनी या लढा-ईत जे काही गूढ वाटण्यासारखे निर्णय घेतले त्याला मी साक्षीदार होतो त्याच-वेळी मी समजून चुकलो होतो की या माणसाचे कर्तृत्व आता संपत आलेले आहे— लवकरच संपणार आहे. फार दक्षतेने वागून, मेहनतीने १९४७ ते १९६२ या १५ वर्षांत जनरल कौलनी त्यांच्या कर्तृत्वाची जी इमारत उभी केली होती ती तीन ऑक्टोबर ते अठरा ऑक्टोबर या कालखंडातल्या अवघ्या पंधरा दिवसात कोसळली.

मी माझ्या लेखणीने कडक टीका करून जनरल कौलना बडवून काढले ते रागाने नव्हे! तर दुःखाच्यापोटी. आघाडीवर आपले जे जवान मेले त्यांच्याबद्दल मला त्यांचा कमांडर या नात्याने दुःख होणे सहाजिक आहे. त्यांचे मृतात्मे आता बोलू शकत नाहीत. नाईलाज म्हणून त्यांच्यातर्फे मला हे कटु कर्तव्य पार पाडावे लागले.

संपली माझी व्यथा! खरे म्हणजे महत्त्वाचे असे जे काही होते ते आता सांगून झालय. खरे म्हणजे इथेच पूर्णविराम द्यायला हवा होता. पण? पण एक सांगा-यचे राहिले—चिन्यानी मला कसा पकडला असावा? या बाबतीत काही लेखकांनी स्वतःच्या अंदाजाप्रमाणे हकीकती लिहिल्या आहेत. खरी गोष्ट अजून अंधारातच आहे आणि ती मी तुम्हाला सांगितलीच पाहिजे. कसा पकडला मला चिन्यानी?

(क्रमशः)

# ▽ ▽ ▽ ▽ ▽ ▽ विकासातील अडसर

## शंभर कोटी बालकांपैकी साठ कोटी बालकांना

आपले राष्ट्रपति श्री. वराहगिरी वेंकट गिरी एका भाषणात म्हणाले होते,

"विकसनशील देशांतील वेगवान लोकसंख्यावाढीमुळे गरिबी व बेकारी यांचे प्रश्न अधिक तीव्र झाले आहेत. आर्थिक आघाडीवरील लाभही त्यामुळे धुवून निघतात. हे भयानक प्रश्न अल्पावधीत सुटू शकत नाहीत. सरकार याबाबतीत पुढाकार घेऊन संयोजकाची भूमिका बजावू शकत असले तरी कृतीशील कार्यक्रमाच्या अमलबजावणीची जबाबदारी मुख्यत्वे लोकांवरच पडते." आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाच्या अशा अनियंत्रित लोकसंख्यावाढीच्या प्रश्नाकडे राष्ट्रपतींनी जनतेचे लक्ष वेधले आहे.

जगाच्या ५ खंडांतील १६३ देशांपैकी २६ देशांत कुटुंब नियोजन कार्यक्रम त्या त्या सरकारांनी पुरस्कारिलेला आहे, तर २४ देशांत कुटुंब नियोजन कार्यक्रमास सरकारी पाठिंबा आहे असे इंटरनॅशनल प्लॅण्ड पेरेण्टहूड फडरेशनने केलेल्या एका पाहणीत दिसून आले. यामुळे जागतिक लोकसंख्येचा ३० टक्के भाग सरकार पुरस्कृत कार्यक्रमाखाली आला आहे. आशियाई व दूर-पूर्व विभागीय आर्थिक मंडळातील ११ देशांची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ५० टक्के असून या देशांतही सरकार पुरस्कृत कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

सन १९५० ते १९८० या २० वर्षांत लोकसंख्येत एक महापद्म एवढी भर पडेल असा अंदाज आहे. एकाफे विभागाचाच विचार केला तर ती ७२ टक्के वाढेल, मध्य दक्षिण आशियात ७९ टक्के वाढेल व आग्नेय आशियात १०० टक्के वाढेल. जगाची लोकसंख्या भयानक वेगाने वाढत आहे. १८५० मध्ये जगाची लोकसंख्या एक महापद्म होती. नंतरच्या ८० वर्षांत ती दुप्पट वाढली म्हणजे १९३० मध्ये ती दोन महापद्म झाली. नंतरच्या तीस वर्षांत आणखी १ महापद्म लोकांची त्यात भर पडली. १९६९ मध्ये ती ३·६ महापद्म एवढी झाली.

लोकसंख्या वाढीचे वाढते प्रमाण आर्थिक विकासाचा वेग हळू हळू मंद करते हे लक्षात घेण्यासारखे आहे. आर्थिक विकासाचा वेग वाढवावयाचा असेल तर आपल्या देशाप्रमाणे लोकसंख्या नियंत्रणाचा जोरकस कार्यक्रम हाती घेण्याची गरज आहे.

भरमसाठ लोकसंख्यावाढीचा विकसनशील राष्ट्रांवर असह्य बोजा पडेल याबाबत जगातील सर्व अर्थतज्ञांचे एकमत आहे. शिवाय लोकसंख्यावाढीचा खरा अर्थ जगातील बालकांच्या संख्येत वाढ असा आहे. जगात आज सुमारे १०० कोटी

बालके आहेत. दर सेकंदाला ३ बालकांचा जन्म होतो. ६० कोटी बालकांना उपासमार सोसावी लागते. जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार ५ वर्षांचे होण्यापूर्वीच प्रत्येक तिसरे मूल मरण पावते व ५ वर्षांखालील ९६ टक्के मुलांना प्रोटीनच्या पुरवठ्याअभावी विविध रोग होतात.

आपल्या देशात गेल्या आठ वर्षातील राष्ट्रीय उत्पन्न आणि शेती व संघटित उद्योग यातील उत्पादन यासंबंधीच्या आकड्यांतून असे दिसते की, १९६५–६६ मधील दरडोई खरेखुरे उत्पन्न १९६०–६१ मधील उत्पन्नाएवढेच होते. यामुळे २·५ टक्क्यांनीं वाढत असलेल्या लोकसंख्येमुळे वाढलेल्या राष्ट्रीय उत्पन्नाना लाभ होऊ शकला नाही.

मात्र परिस्थितीबाबत निराश होण्याचे कारण नाही. तत्पर सार्वजनिक आरोग्य उपाययोजना, अन्नाचे सुयोग्य वाटप व उपलब्धता याचा परिणाम म्हणून विकसनशील देशात बालमृत्यूचे प्रमाण बरेच खाली आले आहे. यामुळे काही मुले तरी जगावीत म्हणून अधिक मुले होण्याची आवश्यकता नाही याची आईबापांना खात्री पटली आहे. यामुळेच २० व्या शतकाच्या उत्तरार्धात विकसनशील देशात छोटया कुटुंबाचा संकेत रूढ होण्यास प्रत्यवाय वाटत नाही.

## महाराष्ट्राची आघाडी

महाराष्ट्रात कुटुंब नियोजनाचा सरकारी कार्यक्रम १२ वर्षांपूर्वी आखण्यात आला असला तरी या कार्यक्रमाला खरी चालना मिळाली ती तिसऱ्या योजनेच्या सुरुवातीपासूनच. परंतु या अल्पावधीतच महाराष्ट्र राज्याने कुटुंबनियोजन मोहिमेत आघाडीचे स्थान मिळविले आहे.

कुटुंब नियोजन चळवळीचे बीजारोपण करण्याचे श्रेय महाराष्ट्रात प्रा. र. धों. कर्वे याचेकडे जाते. १९२५ साली मुंबईत त्यांनी संतति नियमन तत्त्वाचा पुरस्कार सुरू केला. नंतर १९३६ मध्ये डॉ. ए. पी. पिलाई यांनी कुटुंब नियोजन प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू केला. त्यावेळची सामाजिक परिस्थिती कुटुंब नियोजन कार्याला अजिबात अनुकूल नव्हती. मुले कमी होण्याची चर्चा करणे म्हणजे पाखंडीपणा ठरत होता नि संतति नियमन साधनाचा प्रसार म्हणजे अनैतिकतेला आवाहन

असे मानले जाई. परंतु या समाजसुधारकांनी कोणत्याही टीकेला न जुमानता देशहिताचे आपले कार्य चालूच ठेवले.

त्यावेळी केलेल्या बीजारोपणाचा वृक्ष आता चांगला वाढीस लागला आहे. सरकारने हाती घेतलेल्या मोहिमांचे खतपाणी मिळून सर्व समाजाला छाया देण्याची शक्ति त्याला आली आहे.

पाचव्या योजनेच्या सुरवातीलाच १९६१ सालचे जनगणनेचे अहवाल हाती आले नि अफाट लोकसंख्यावाढीच्या भस्मासुराचे स्वरूप स्पष्ट होऊ लागले. नतर तिसऱ्या योजनेत आलेल्या अनुभवावरून कुटुंब नियोजन कार्यक्रमाला नवीन स्वरूप देण्यात आले. हा नवीन समाजाभिमुख कार्यक्रम जून १९६७ मध्ये सुरू झाला व त्यासाठी राज्यातील २५ जिल्हा परिषदा, मुंबई महानगरपालिका नि इतर महानगरपालिका, नगरपालिका, व ग्राम पंचायती यांचे सक्रिय सहकार्य मिळविण्यात आले. अशा रीतीने स्थानिक संस्थांतील लोक-नियुक्त प्रतिनिधींचा पाठिंबा मिळाल्यामुळे कुटुंब नियोजनाचा प्रसार होण्यास खूपच मदत झाली.

## कुटुंब नियोजनाला अग्रक्रम

शेतकी किंवा अल्प बचत कार्यक्रमाला जेवढे महत्त्व देण्यात येते तेवढेच प्राधान्य कुटुंब नियोजन कार्यक्रमाला देण्यात आले आहे. या खात्याचे अधिकारी दौऱ्यावर गेले की, आपल्या कार्यक्रमाबरोबरच कुटुंब नियोजनाचाही प्रचार करतात. खत वाटपाच्या वेळी किंवा कर्ज देताना संतति नियमनाचा केलेला प्रचार चांगल्या प्रकारे ऐकला जातो हा व्यवहारातील अनुभव आहे.


कुटुंब नियोजन हा कामगार कल्याणाचाच एक भाग आहे याची उद्योगधंद्यांनाही जाणीव आहे. त्यामुळे खाजगी तसेच सरकारी कारखाने व कंपन्या यांनीही या कार्यक्रमात पुढाकार घेतला आहे. कोहीनूर मिल्स, गोद्रेज कंपनी अशा कितीतरी कंपन्या कुटुंब नियोजन करणाऱ्या कामगारांना प्रोत्साहन म्हणून आर्थिक मदत देतात. तुर्भे येथील खत कारखान्याने बाहेर जाणाऱ्या एक पंचमांश पोत्यांबरोबर कुटुंब नियोजन साहित्य पाठविण्याचे मान्य केले आहे. अनेक कंपन्यांतून कामगारांना संतति नियमन साधने पगाराबरोबरच देण्यात येतात.

महाराष्ट्राची राजधानी असलेले मुंबई शहर हे कुटुंब नियोजन कार्यक्रमातही अग्रेसर आहे. राज्यातील एकूण लोकसंख्येच्या १० टक्के लोक येथे राहतात; परंतु राज्यात झालेल्या एकूण शस्त्रक्रियांपैकी १८ टक्के शस्त्रक्रिया मुंबईत झाल्या आहेत. शस्त्रक्रिया करण्यासाठी शहरात आता फिरत्या गाड्यांची सोय करण्यात आली आहे.

## मदतनीस योजना

फिरत्या शस्त्रक्रिया केन्द्रांमुळे शस्त्रक्रिया आता उपनगरातून आणि शहरातील अंतर्भागातही करणे सोयीचे होते. गलिच्छ वस्त्या आणि मागास वर्गामध्ये कुटुंब

नियोजनाचा प्रसार करण्याचा आणखी एक अभिनव उपक्रम राज्यात सुरू करण्यात आला आहे नि तो म्हणजे मदतनीस योजना. गलिच्छ वस्त्यातील किंवा विशिष्ट वर्गातील पुढारी समजले गेलेले लोक आपल्या वस्तीत किंवा जमातीत कुटुंब नियोजन साधनांचा प्रचार करतात. यावेळी शस्त्रक्रियेवर भर देण्यात येतो व एकादी शस्त्रक्रिया करण्यात आली की, ज्याने या कामात प्रचार केला त्या मदतनीसाला काही रक्कम देण्यात येते.



यावर्षीपासून सुरू केलेली फिरती केंद्रे

महाराष्ट्र राज्याने आपल्या कुटुंब नियोजन कार्यक्रमात शस्त्रक्रिया करण्यावर अधिक भर दिला आहे. दोन किंवा तीन अपत्ये असलेल्यांना सर्वात खात्रीचे संतति नियमन साधन म्हणजे मातापित्यांपैकी एकाने शस्त्रक्रिया करून घेणे हा होय. २–३ मुले असलेल्या दांपत्यांची सख्या एकूण जननक्षम दांपत्यात अधिक असते व लोकसख्या वाढीला आळा घालण्याचे काम करायचे ते त्यांनीच, म्हणूनच त्यांच्याकडे प्रथम लक्ष पुरविण्याचे धोरण राज्याने स्वीकारले आहे. १९५७ मध्ये कुटुंब नियोजन कार्यक्रम सरकारीरीत्या सुरू झाला, त्यावर्षी राज्यात केवळ ८६३ शस्त्रक्रिया करण्यात आल्या. गेल्या वर्षी शस्त्रक्रिया करण्याचे प्रमाण दर हजारी लोकसंख्येमध्ये ५.७ पडले. शस्त्रक्रियेबाबत राज्याने केलेल्या या नेत्रदीपक कार्यामुळे चार राष्ट्रीय पारितोषिके राज्याने पटकावली आहेत. चालू वर्षी दर हजारी लोकसख्येमध्ये सात म्हणजे ३,४४,४९८ शस्त्रक्रिया करण्याचे उद्दिष्ट राज्याने ठरविले आहे.

कुटुंब नियोजनाचा प्रसार व्हावा म्हणून विविध प्रकारचे अभिनव उपाय राज्य सरकारने योजले आहेत. रेल्वे स्थानकांवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केन्द्राची सोय, शस्त्रक्रिया व लूप बसविण्यासाठी शिबिरे, फिरती शस्त्रक्रिया व कुटुंब नियोजन केन्द्रे हे सर्व उपक्रम लोकप्रिय झाले आहेत. त्यामुळे या वर्षातील उद्दिष्टे साध्य होतील, असा विश्वास राज्यात निर्माण झाला आहे.

□ □ □



शरद गोखले

# रंगधारेने अखेर काय साधले ?

व्यावसायिक रंगभूमीवर मार खाल्लेले नाटक पुन्हा उभे करण्याचे तसे काही कारण नाही. तथापी या क्षेत्रात नवीन उमेदीने उतरलेल्या डॉ. श्रीराम लागू यांनी हा प्रयोग केला आणि नाटकाच्या पहिल्या प्रयत्नात आलेल्या अपयशावर शिक्कामोर्तब केला.

श्री. ना. पेंडसे यांच्या या नाटकाचे मूळचे नाव 'राजे मास्तर'. मास्तरांची कारकीर्द काही चालू शकली नाही, आणि मग रंगधारेने राजे मास्तरांना 'अखेरचे राजे' केले. मातब्बर मंडळींचा नटसंच, महत्त्वाकांक्षी दिग्दर्शक, उत्कृष्ट तंत्रज्ञ आणि प्रथम श्रेणीची निर्मितीमूल्ये असूनही हे नाटक मार खाते.

कोकणातल्या एका खेड्यात राजे घराणे एकेकाळी मोठ्या मानाने मिरवले आहे. याच घरातील भाईंचे चिरंजीव म्हणजे राजे मास्तर. आपल्या चिरंजीवांच्या-कर्तृत्वासंबंधी भाईंना शंका असते, त्यात त्यांचे ज्योतिषज्ञानावरून आपल्या मुलाच्या कुंडलीत पुत्रयोग नाही ही गोष्ट भाईंच्या लक्षात येते. मानसिक दृष्ट्या विकलावस्थेत असताना भाई जगाचा निरोप घेतात. हा कथासूत्राचा पूर्व भाग, कारण भाईंचे प्रत्यक्ष अस्तित्व नाटकात नाही. त्यांच्यासंबंधीं जी थोडीफार माहिती मिळते ती संवादातून. घराण्याचे वैभव निघून जाते. परंतु राजे मास्तर आपल्या व्यवसायाशी एकरूप होऊन जातात. विद्यार्थी आणि शाळा या पलीकडे त्यांची दृष्टी जाऊ शकत नाही. मास्तरांच्या सुदैवाने त्यांना लक्ष्मीसारखी पत्नी मिळाली आहे. कोंड्याचा मांडा करून ती पतीला साथ देते आहे, तिच्या सर्व आशा-आकांक्षा आपल्या मुलावर—नंदूवर केंद्रीत झाल्या आहेत. मास्तरांचे अनेक विद्यार्थी लहानाचे मोठे होऊन जीवनाच्या विविध क्षेत्रात उतरले असले तरी ते मास्तरांना विसरलेले नाहीत. आवर्जून ते मास्तरांची भेट घेत आहेत, आणि मास्तरांना कृतार्थता वाटते आहे. अशा विद्यार्थ्यांपैकीच एक निर्मल—पदवी परीक्षेत प्रथम श्रेणीचे यश मिळवून निर्मल गावी आला आहे. काही निश्चित योजना त्याच्याजवळ आहेत. या योजनांच्या कार्यवाहीतून एक नवीन वादळ उठते. गावात

संघर्ष सुरू होतो; आणि सोन्या बापूचे प्रभावी व्यक्तित्व रंगभूमीचा ताबा घेते. सत्–असत्च्या भोवऱ्यात सापडलेल्या मास्तरांच्या सत्वपरिक्षेच्या वेळी मास्तरांचा बळी घेणारा क्षण येतो. परंतु आजारी नंदूच्या मृत्यूने कथानक वेगळी कलाटणी घेते. मास्तरांचा सूड घेऊ इच्छिणारे बापू–मास्तरांची बदली करवितात. तीही निवृत्तीला केवळ सहा महिने बाकी असताना. मास्तरांचा सत्कार करून त्याना निरोप देण्याचे बापूंचे नाटक–निर्मलने त्याला जीव तोडन केलेला विरोध–यातून निर्माण झालेल्या संघर्षाची परिणती मास्तरांच्या राजीनाम्यामध्ये होते. मास्तर लक्ष्मीसह आपल्या नवीन जीवनाला सुरुवात करतात.

नाटकाचा केंद्रबिन्दु राजे मास्तर. मास्तरांची कथा जर अचूक प्रेक्षकांपर्यन्त पोचवता आली असती तर नाटक यशस्वी झाले असते; पण प्रेक्षकांच्या लक्षात राहते ती राजे घराण्यावर प्रेम करणारी म्हातारी म्हांबरी, महाबिलंदर सोन्याबापू आणि करुण मूर्ती लक्ष्मी. किशाच्या प्रसंगातून मास्तरांचे व्यक्तित्व उभारण्याचा प्रयत्न केला आहे. विद्यार्थ्यांच्या हितासाठी वरिष्ठांच्या रोषाची पर्वा न करणारे मास्तर, प्रसंग येताच आपल्या मुलाच्या दररोज ढासळत जाणाऱ्या तब्येतीकडे दुर्लक्ष करून किशासाठी आपले सर्वस्व पणाला लावणारे मास्तर, यातून मास्तरांचे वेगळे आणि अपेक्षित असणारे व्यक्तित्व निश्चित आढळते. आढळत नाही ती अपेक्षित उंची. मग हे अपयश कुणाचे? अपयशाचे पहिले मानकरी लेखक पेंडसे, आणि त्या खालोखाल दिग्दर्शक डॉ. लागू. राजे मास्तरांचे व्यक्तित्व कच्च्या कथानकामुळे पुरेशा तेजस्वीपणे उभे राहू शकत नाही. म्हणून नाटक संपल्यावर प्रेक्षकांवर जो परिणाम व्हावा अशी अपेक्षा आहे त्याचा लवलेशही दिसत नाही. तुलनाच करायची झाली तर एखाद्या कादंबरीचे वाचन, आणि त्याच कादंबरीचे जिवंत स्वरूपातील रंगभूमीवरील अथवा रजतपटावरील दर्शन, यामुळे वाचकाच्या अथवा प्रेक्षकाच्या मनावर होणाऱ्या परिणामांमध्ये जर तफावत नसेल, तर ते रंगभूमीवरील अथवा रजतपटावरील कलाकृतीचे अपयश समजण्यास हरकत नाही. आणि याच दृष्टीने 'अखेरचे राजे' अयशस्वी वाटतात. एखादी सलग कलाकृती पाहिल्यामुळे प्रेक्षकाच्या मनावर कलाकृतीच्या स्वरूपाप्रमाणे जो अपेक्षित परिणाम व्हावा त्याची अनुपस्थिती "अखेरचे राजे" या नाटकाच्या संदर्भात तीव्रतेने जाणवते. सदोष नाट्यरचना, आणि प्रसंगांची विस्कळीत गुंफण यामुळे सलग कलाकृती पाहिल्याचे समाधानही प्रेक्षकांना मिळू शकत नाही.

लेखनातील दोष प्रयोग पहात असतानाही प्रकर्षाने जाणवतात. गावकरी मंडळींच्या दुय्यम प्रवेशांना अकारण महत्त्व दिले गेले आहे. सोन्या बापू येण्यापूर्वी त्यांच्या घरी घडलेला धोंडूमामा आणि मंडळींचा प्रसंग, आणि राजे मास्तरांच्या घरी मास्तर घरात नसताना याच मंडळींना पकडून आणून घडवलेला प्रसंग, यांचा उल्लेख करता येईल. यापैकी पहिल्या प्रसंगाचा हेतु गावातील बदलत्या वाता-

चरणाची दखल घेणे हा आहे. तर दुसरा प्रसंग मास्तरांचे व्यक्तित्व 'ग्लोरीफाय' करण्यासाठी योजलेला आहे. दोन्ही प्रसंग त्यांच्या अपेक्षित हेतूच्या मर्यादा सोडून वाटचाल करतात. आणि त्यांचे हे रेंगाळणे प्रयोगाच्या परिणामाला मारक ठरते.

चांगल्या प्रयोगासाठी जे जे असावे लागते ते ते सर्व रंगधारेने एकत्र आणले आहे. आणि तरीही नाटक उभे रहात नाही. याचे प्रमुख कारण ज्यासाठी हा सर्व अटापिटा केला ते नाटकच त्या उंचीचे नाही. अन्यथा नवीन उमेदीने व्यावसायिक रंगभूमीवर उतरणारा डॉ. लागूंसारखा दिग्दर्शक, चंद्रकान्त गोखले, सुमति गुप्ते, सुलभा देशपांडे, दत्ता भट, यांसारखे उत्कृष्ट कलावत, नेपथ्य, प्रकाश-योजना, ध्वनिमुद्रण यांची उत्कृष्ट जोड असूनही नाटक इतके निष्प्रभ ठरते ना.

प्रयोगाच्या जमेच्या बाजूला कलाकारांची कामगिरी, हा महत्वाचा भाग आहे. विशेषत्वाने उल्लेख केला पाहिजे सुलभा देशपांडे यांच्या म्हांबरीचा. दिग्दर्शक या नात्याने लागू यांनी कलावंतांकडून चांगली कामगिरी करवून घेतली आहे. मास्त-रांच्या वाड्यातील पाराचा त्यांनी मास्तरांच्या विचार–मंथनाचे वेळी उत्कृष्ट उपयोग करून घेतला आहे. वातावरणनिर्मितीमध्येही त्यांनी उत्कृष्ट यश मिळवले आहे. अपवाद फक्त पालखीचा प्रसंग. अतिशय चैतन्यहीन असा हा प्रसंग आहे. ध्वनि-मुद्रित पार्श्वसंगीतातून निर्माण होणारे चैतन्य आणि चैतन्यहीन असा दृष्य प्रसंग यातून पडणारी तफावत विलक्षण जाणवते.

प्रयोग पाहिल्यावर चटकन मनात येते ते हे की, उत्तम कलावंत व उत्तम निर्मिती खर्ची घालून रंगधारेने मिळवले काय ?

□ □ □


## पुरंदऱ्यांची दौलत

श्रीमंत बाजीराव पेशवे / तुळशीबागवाला / खासा फिरंगी मारिला / जिद्द / खासगीवाला / खंडेराव दरेकर / तलवारीचे पाते / पालखी / पुरंदऱ्यांची दौलत

नऊ पेशवेकालीन कथा

ब. मो. पुरंदरे

किमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन



# कुळधर्म मऱ्हाठी अस्सा ....

बाबासाहेब पुरंदरे

सारे सुरत शहर उलटया सुलटया दिशांनी सैरावैरा पळत सुटले होते. किंकाळया उठत होत्या. आरडाओरडयाने कुणाचेच कुणाला काही ऐकू येत नव्हते. साऱ्या रस्त्यावर केवळ पळापळ चालली होती. धक्का-बुक्की होत होती. एकमेकांना धडका बसत होत्या. कुणी पडत होते.

पुन्हा घाईघाईने उठून धावत होते. बायका, पुरुष, पोरे, म्हातारे जीवाच्या भयाने धावत होते. साऱ्यांनाच दरदरून घाम फुटला होता. घरेदारे सताड रिकामी टाकून लोक पळत होते. त्या धावत्या वादळात मधूनच एखादा मुघली घोडेस्वार बेफाम दौडत जात होता. त्याच्या टापा चुकवण्यासाठी लोकांची हटाहाट होत होती. पोरे रडत होती. जीव बचावू पाहणाऱ्या धनिकांचे मधूनच मेणे आणि पालख्या गर्दीतून वाट काढीत धावत होत्या. पालखी-मेण्यांत बसलेल्या व्यक्ती भोयांना ओरडून ओरडून सांगत होत्या,

" जल्दी करो, जल्दी करो ! दौडो दौडो ! मरहट्टा आ गया, दौडो ! "

जेवढी घेववेल तेवढी आपली धनदौलत घेऊन बायकापोरांसह लोक पळत होते. सुरतेच्या बाहेर पडत होते. अफवा आणि आवया उठत होत्या. त्यामुळे घबराटीला उधाण चढत होते. ज्याच्या त्याच्या तोंडी एकच भयभीत कापरा आवाज होता,

" शिवाजी आला ! शिवाजी आला ! शिवाजी आला ! "

सुरतेचा मुघल सुभेदार इनायतखानही इतका घाबरला होता की आपल्या एक हजार मुघली घोडेस्वारांनिशी तो सुरतेच्या किल्ल्यात आश्रय घेण्यासाठी दौडत होता. सुरतेचा भुईकोट किल्ला शहरातच होता. सुभेदाराचे हजार स्वार त्या किल्ल्याच्या प्रचंड दरवाजातून आत घुसत होते. सुरत शहराचे रक्षण करण्याऐवजी हा सुभेदार घाबरून लपत होता. महाराज शिवाजीराजे सुरतेवर आले होते; पण अजूनही ते शहरापासून दूर उभे होते. त्यांच्याभवती पाच हजार मराठी घोडा त्यांच्या हुकुमाची वाट पाहत कान टवकारून उभा होता. महाराजांनी इनायतखानाला वकिलामार्फत निरोप पाठवला होता की, " आम्हाला एक कोटी रुपये खंडणी द्या. आम्ही निघून जातो. शहरात येणार नाही. "

महाराज खंडणी मागत होते. त्यांचे म्हणणे त्यांनी साफ साफ शब्दांत सुभेदाराला कळवले होते. महाराज म्हणत होते,

" आम्हाला खंडणी द्या. ती आम्ही मागतो आहोत. कारण की, तुमच्या मुघल सुभेदार शाहिस्ताखानाने पुण्यात तळ देऊन गेली तीन वर्षे आमच्या मुलखाची कोटयवधी रुपयांची लूट व खराबी केली. गावे

उजाड केली. अजूनही हा धुमाकूळ चालूच आहे. त्याची नुकसानभरपाई म्हणून तुमच्यापाशी फक्त एक कोटी रुपये मागतो आहोत. तुम्ही मुघल सुभेदार आहात. एक कोटी रुपये देणे तुम्हाला मुळीच अवघड नाही. अमाप सम्पत्ति असलेले सावकार शहरात आहेत. ते इतके श्रीमंत आहेत की, त्यांतील कुणीही एकटासुद्धा एक कोटी रुपये सहज देऊ शकेल ! आम्ही तुम्हासह सर्व श्रीमंतांकडून मिळून एक कोटी मागतो आहोत. ताबडतोब द्या ! नाही तर आम्हाला ती सक्तीने न्यावी लागेल !"

खुद्द स्वतः इनायतखानही गबर पैसेवाला होता. तो सरकारी पैसा खाऊन गब्बर झाला होता. पण इनायतखानाने महाराजांना खंडणी द्यायचे साफ नाकारले. त्याने खंडणीही नाकारली आणि लढाईही चुकवली. तो सरळ सरळ युद्धाला आला असता तरीही मोठा ठरला असता. पण तो नादान नामर्द लपून बसला !

महाराजांचा हुकूम सुटला. मराठी घोडेस्वार शहरात घुसले. बहीर्जी नाईक आघाडीला दौडत होता. 'बडया बडया श्रीमंतांच्या घरावर झडप पडली. टापांचा खडखडाट आणि आरोळया, बंदुकांचे आवाज आणि किंकाळया यांनी सुरत कोंदून गेली.

आणि एक बाई आपल्या कच्च्याबच्च्यांना पोटाशी धरून हुंदके देत आपल्या घरात केवीलवाणा मुका आक्रोश करू लागली. ती वर आकाशाकडे पाहत देवाला विनवीत होती, वाचव, देवा वाचव ! या पाडसांना तरी वाचव !'

एवढया मोठया हवेलींत ती बाई एकटीच त्या पिलांना आपल्या हातांच्या पंखाखाली घेऊन बसली होती. पुरुषमाणूस कुणीही नव्हते. पोरे घाबरली होती. ती तिला बिलगली होती. ती हवेली फार सुंदर, डौलदार होती. हवेलीत धनदौलत अमाप असावी असे स्पष्ट दिसत होते. मोठे मोठे आरसे. नक्षीदार आलमाऱ्या, झुंबरे, मौल्यवान कपडा-लत्ता, किंमतवान भांडीकुडी, तिजोऱ्या, गालिचे, पडदे अन् सारीच श्रीमंती मालमत्ता. हवेलीचे बांधकाम फिरंगी डौलाचे होते. दिवाण-खाना फिरंगी थाटात सजवलेला होता. कोणाकोणा फिरंग्यांच्या तसबिरा भिंतीवर लावलेल्या होत्या. भिंतीवर मेणबत्त्यांची शमादाने बसविलेली

होती आणि त्यांच्या मध्यावर क्रूसावर लटकावलेल्या येशू खिरिस्तावाचे रंगीत चित्र होते.

ती बाई गोरीपान होती. खिरिस्ताव होती. गोऱ्या मुलखातून आलेली ती एक विधवा बाई होती. ती वलंदेजी होती. वलंदेजी म्हणजे हॉलंड देशातली. या बाईचा नवरा खूप श्रीमंत होता. त्याने व्यापारात अफाट पैसा मिळवला आणि गोरगरिबांकरिता सुरतेत त्याने त्यांतून खर्चही केला. तो माणूस फार उदार आणि दयाळू होता. तो सुरतेतच पुढे वारला. मागे राहिली त्याची ही विधवा पत्नी, पोरे, घर आणि सम्पत्ति.

सुरतेवर महाराजांची स्वारी आलेली पाहून सुरतेत एकच हलकल्लोळ उडाला. सारे शहर पळत सुटले. सर्वांना थरकाप सुटला. ज्याच्या हातीपायी बळ होते ते पळाले. कित्येकांनी तापी नदी ओलांडली. पण या परक्या मुलखातून आलेल्या नवख्या बाईने पोरेबाळे घेऊन कुठे पळावे? कसे पळावे? एवढं भरलेले घरदार टाकून कुठे जावे? बाईला काही कळेना. बाईची ही हवेली सुरतेतच पण जरा एका बाजूला होती. बाहेर ओरडा आणि धावपळ चालली होती. बाई गोंधळून गेली होती. आपल्या घराकडे आणि पोरांकडे ती केवीलवाण्या नजरेने पाहत होती. छातीत भीतीचा गोळा उठत होता. तिला भास होत होता, आपले घर पेटल्याचा. आपली पोरे तलवारीच्या घावाखाली किंचाळत्या फोडीत मरत असल्याचा. तिला भविष्य भेडसावीत होते. ती असहाय्य होती. भेदरलेली पोरे तिला बिलगली होती. आपला नाश होणार असे ती धरून चालली होती.

आणि तिने पोरांना उराशी धरले. जे होईल त्याला तोंड द्यायचे, असे तिने ठरवले. असेच ठरवणे तिला भाग होते. हा तिचा अगतिक, असहाय्य केवीलपणा निर्धार होता. तिचे प्रभू येशूच्या प्रतिमेकडे पाहिले. तिला हुंदका फुटला.

अन् दुरून घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकू येऊ लागला. तिच्या छातीत धस्स् झाले. तिने वर पाहिले. टापांचा आवाज वाढत होता. आरोळ्या ऐकू येत होत्या. तिच्या हृदयाची धडधड वाढली. डोळे विस्फारून ती घरातूनच समोर दूरवर भिरीभिरी पाहू लागली. अन्

तिला दिसले दहा पंधरा मराठी घोडेस्वार! नागव्या तलवारी घेतलेले. चौखूर दौडत येत असलेले! आपल्या सर्वनाशासाठी मृत्यूच दौडत येत आहे अशी तिची खात्री झाली. खरोखर ते घोडेस्वार तिच्याच घराच्या रोखाने दौडत येत होते. सारे घरदार आपल्याभवती गरगरा फिरतेय असे तिला वाटले. घाबरलेली पोरे तिला जास्त बिलगली. तिला हुंदका फुटला. तिने डोळे घट्ट मिटून घेतले. घोडेस्वार तिच्या घरापाशी येऊन थडकले. टापांचा आवाज थांबला. ऐकू येऊ लागला तिला स्वत:चा आणि मुलांचा श्वासोच्छ्वास. ती आता वाट बघत होती फक्त मृत्यूची. तलवारीचे घाव मानेवर पडण्याची. तिने डोळे मिटून घेतले होते. एक क्षण गेला. दोन क्षण गेले. तीन क्षण गेले. चार...सहा...पंधरा...पंचवीस...! काहीच घडत नव्हते. काहीच ऐकू येत नव्हते. तिला आता एक एक क्षण जड वाटत होता. ती मरणाची वाट बघत होती. पण मरणाचीच काय, माणसाची–वाऱ्याचीही चाहूल येत नव्हती. तिला हे विचित्र वाटत होते.


**पुरंदऱ्यांची नौबत**

बुलंद बुरुज / हूल / कोजागिरीची रात्र / पंत
फोंडा! फोंडा! / नावजी बलकवडे
पिऱ्या बेरड / इमान

आठ शिवकालीन कथा

ब. मो. पुरंदरे
किंमत : साडेतीन रुपये
राजहंस प्रकाशन

तिने मान वर केली. डोळे उघडले. घरात कुणीच घुसलेले नव्हते. ती गोंधळली. मराठी स्वार बाहेरच उभे होते. आश्चर्यच ! ती धीर करून अलगद उठली. दाराशी आली. मराठी स्वार बाहेरच उभे होते. बाई बाहेर आली. आवंढा गिळीत धारिष्टाने ती पुढे आली. स्वार गप्पच होते. ती डोळे पुसून पुढे येत येत आपल्या मोडक्या तोडक्या हिंदुस्थानी भाषेत म्हणाली,

"तुम्ही बाहेरच कसे थांबलांत ? मला वाटलं, तुम्ही माझे घर लुटणार. जाळणार. आम्हाला मारणार !"

हे तिचे बोलणे त्या मराठ्यांनी ऐकले. त्या राकट मराठी मुद्रांवर हसरा तरंग उमटला. रांगड्या, मराठमोळ्या हिंदुस्थानीत त्यांनी बाईला उत्तर दिले,

नाही बाई. असं व्हायचं नाही. या घरात खूप पैका आहे; पण घरात कुणीही पुरुषमाणूस नाही। एकली एक बाई अन् पोरंबाळं आहेत हे आमच्या राजाला माहीत झालं. म्हणून, या घराला कुणी धक्का लावू नये म्हणून आमच्या राजाने या घराची राखण करायला पाठवलंय आम्हाला."

"काय – काय सांगता ? खरंच ? शिवाजीराजानं ?"

"होय होय. घाबरू नको बाई. कुणी काही करणार नाही. शिवाजी राजाची माणसं आहोत आम्ही."

आश्चर्य, आनंद, कृतज्ञता, आदर, गहिवर अन् सारे सारे कांही एकदम तिच्या हृदयातून उचंबळून आले. तिचे ओठ थरथरू लागले. तिच्या डोळ्यातून घळकन् अश्रू ओसंडले. गेलेले हातीपायीचे बळ एकदम आले. ती धावत आत गेली अन् पोरांना तिने पोटाशी धरले.

समोरच्या भिंतीवरची प्रभु येशू ख्रिस्ताची प्रतिमा शमादानाच्या उजेडात उजळून निघत होती.

◻ ◻ ◻

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर




" नाही ! नाही ! याला सोशॅलिस्टीक पॅटर्न आणण्याचा प्रयत्न
असं म्हणता नाही यायचं ! हा केवळ निसर्गाचा...... "